मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शुक्रवार, १३ जून २०२५ | वर्ष: १ | अंक:१६ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## खासदार सुनील तटकरे यांच्या भाच्याची पत्नी अपघातग्रस्त विमानात सिनियर क्रु-मेंबर



मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

अहमदाबाद येथून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे भाचे अमोल महाडिक यांच्या पत्नी अपर्णा अमोल महाडिक या सिनियर क्रु-मेंबर असल्याची माहिती समोर आली आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे या मुंबईत गोरेगांव येथे महाडीक यांच्या घरी पोहोचल्या असून पूढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे.

# विमान कोसळले

## 241 प्रवासी ठार





**मृतांमध्ये १६९ भारतीय, ५२ ब्रिटीश, ७ पोर्तुगालचे, कॅनडाचा एक नागरिक आणि १२ क्रू मेंबर्सचा समावेश**

**मेडिकल कॉलेजवर विमान कोसळल्याने तीन डॉक्टर ठार, तर ४५ जखमी**

## अग्रलेख — खरीखरी

### दुर्दैवी अपघात

आज गुजरातच्या अहमदाबाद येथे एका बोईंग विमानाचा अपघात झाला. त्यामध्ये पायलट आणि १२ क्रू मेंबरसह एकूण २४२ प्रवाशांचा समावेश होता. विशेष म्हणजे सुदैवाने त्यामधील एक सुदैवी किंवा नशीबवान प्रवासी बचावला आहे. ज्याप्रमाणे समुद्रात बुडलेल्या टायटॅनिकच्या अपघातातून काही नशीबवान प्रवासी बचावले होते. तसाच काहीसा प्रकार या सुदैवी नागरिकाचा आहे. विमान अपघात होणे म्हणजे विमानातील जवळजवळ सर्वच प्रवाशांच्या जीवावर बेतणे. असा आजवरचा अनुभव आहे. या विमानाने उड्डाण घेतल्यावर जितक्या उंचीवर हे विमान उडायला हवे. त्यापेक्षा अर्धी उंची जेमतेम पार केल्यावर या विमानाला पहिला झटका बसला. साधारणपणे १२०० फुटांवरती अशा प्रकारच्या विमानांचे उड्डाण झाल्यावर प्रवासाची सुरुवात होत असते. कारण त्या ठिकाणी ते विमान स्थिर होत असते. मात्र आज हे विमान अवघ्या ६२५ फुटांवर गेले आणि मग वर चढलेच नाही. उड्डाण घेत असतानाच विमानाच्या शेपटीला कुठल्यातरी भिंतीचा धक्का लागला. त्यानंतर हे विमान वर चढलेच नाही. हेलकावे घेत खाली खाली गेले आणि विमानाच्या हेलकाव्याबरोबर त्यात बसलेल्या दुर्दैवी प्रवाशांच्या हेल काव्याने किती गोंधळ उडाला असेल. याची कल्पना करणे कल्पनेच्याही पलीकडचे आहे. या बोइंग विमानात १६९ भारताचे प्रवासी होते. सात पोर्तुगालचे प्रवासी होते. एक कॅनेडियन नागरिक होता. त्यासोबतच ११ लहान वयाच्या मुलांसह दोन नवजात बालके या अपघातामध्ये बळी पडली. आता असे सांगितले गेले आहे की, हे विमान बारा वर्षे जुने होते. उड्डाणापूर्वी दिल्लीवरून येताना दिल्लीत या विमानाची काटेकोर तपासणी झाली असावी. कारण कोणतेही विमान उड्डाण करण्यापूर्वी तशी तपासणी करण्याची प्रथा आहे. ते विमान एअर इंडियाचे बोइंग विमान आहे. भारतातील विमान उड्डाण करणारी एअर इंडिया ही पहिली कंपनी आहे. टाटांची मालकी ज्या कंपनीमध्ये असते. त्या कंपनीला सरकारने ताब्यात घेतले होते. पण शेवटी प्रचंड तोटा झाला आणि परिस्थिती हाताच्या बाहेर गेली. त्यामुळे पुन्हा एअर इंडिया टाटांच्या ताब्यात आली. टाटा यांच्या कारभाराबद्दल, त्यांचा प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुख कारभाराबद्दल सर्व भारतीयांना नवीन काही सांगावे. असे आम्हाला आता वाटत नाही. परंतु टाटांनी कंपनी ताब्यात घेतल्यानंतर अजूनही एअर इंडियाचा कारभार जसा पाहिजे. तसा व्यवस्थित झाला नाही. हे मान्यच करावे लागेल. तरीही एअर इंडियाच्या कार्यपद्धतीला एका विमान अपघातामुळे दोष देणेही योग्य वाटत नाही. सध्याच्या काळात अपघात झाला नाही असा दिवस जात नाही. प्रवासी बस, रेल्वे, खाजगी कार अपघात, एक्सप्रेस वे आणि हायवेवर होणारे अपघात वगैरे सारख्या अपघातामधून भारतात काही मरतात आणि काही वाचतात. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे विमानाच्या अपघातात सहसा कोणी वाचत नाही. तरीही या विमानातील एक प्रवासी वाचण्याचा चमत्कारच झाला आहे, असे आता म्हणावे लागेल. पंधरा-वीस वर्षांपूर्वी या क्षेत्रात अनेक कंपन्या आल्या होत्या. त्यापैकी कितीतरी कंपन्यांना आता टाळे लागले आहे. त्यात विजय मल्ल्याच्या किंगफिशर सारख्या अनेक कंपन्यांचे पार वाटोळे झालेले आहे. एअर इंडिया ही सरकारी कंपनी आणि दुसरी सध्याच्या काळात अत्यंत वेळेवर धावणारी कंपनी म्हणजे इंडिगो ही आहे. इतरही लहान मोठ्या कंपन्यांचे सध्यातरी बऱ्यापैकी चाललेले आहे. आजच्या अपघाताच्या मुळाशी जाऊन अपघाताची कारणे शोधावी लागतील. एअर इंडियाच्या मागचे शुक्लकाष्ट अजूनही का बरे दूर होऊ शकत नाही. याचा आढावा सुद्धा घ्यावा लागेल. आज देशात इंडिगो पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर एअर इंडियाचा क्रमांक लागतो. त्यामुळेच आता या विमान अपघाताचा सर्वांग परिपूर्ण चौकशी अहवाल हाती आल्यावरच त्यावर भाष्य करता येईल. विमानातील तमाम प्रवाशांच्या जीवाची झालेली हानी भरून निघणे शक्य नाही. त्यांच्या कुटुंबाला बसलेला धक्का त्याची कल्पना करता येणे शक्य नाही. नवजात बालके आणि जी काही अत्यंत लहान वयाची मुले, ज्यांनी अजून पुरती दुनिया पाहिलीच नाही आणि या दुनियेतून त्यांना अलविदा व्हावे लागले. या सगळ्या गोष्टी म्हणजे दुःखाची परिसीमा आहे. काळीज हे लावून टाकणाऱ्या या अपघातामध्ये ज्यांना आपला जीव गमवावा लागला. त्या सर्व दुर्दैवी प्रवाशांना आणि अपघात स्थळी ज्यांना आपला नाहक जीव गमवावा लागला.

**त्या सर्वांना आमची अश्रुपुरीत श्रद्धांजली!**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचेही निधन



अहमदाबाद, दि. १२ वृत्तसंस्था

**गुजरातच्या अहमदाबादमधील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील मेघानी नगर परिसरात झालेल्या विमान दुर्घटनेत मोठी मनुष्यहानी झाली आहे. या विमानातून तब्बल २४२ प्रवासी प्रवास करत होते. त्यामध्ये, २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे या विमानातून गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हेही प्रवास करत होते, त्यांचेही अपघातात निधन झाले. विमानातील एकूण २४२ प्रवाशांमध्ये, १६९ भारतीय प्रवासी, ५३ ब्रिटीश नागरिक, पोर्तुगालचे ७ आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत होते, अशी माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत सर्वच प्रवासी मृत्युमुखी पडले आहे. जवळील रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळत आहे. या दुर्घटनेनं अवघा देश शोकसागरात बुडाला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करून शोक व्यक्त केला.**

अहमदाबादमध्ये तब्बल २४२ प्रवाशांना घेऊन जाणारं प्रवासी विमान अहमदाबादच्या मेघाणीनगर परिसरात कोसळले. एअर इंडियाच्या ह्या विमानाने अहमदाबादहून लंडनसाठी उड्डाण केले होते. मात्र, दुपारी १.३१ वाजता केलेल्या उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांतच विमान खाली कोसळले. या विमानातील २४२ प्रवाशांमध्ये १२ क्रू मेंबर, २ नवजात बाळ, ११ लहान मुले, २१७ प्रौढ प्रवासी प्रवास करत होते. त्यामध्ये, १६९ भारतीय, ५३ ब्रिटीश नागरिक, पोर्तुगालचे ७ आणि कॅनडाचा एक नागरिक होता. त्यामुळे, या दुर्घटनेनंतर ब्रिटनच्या पंतप्रधानांनीही ट्विट करुन शोक व्यक्त केला आहे. विमान कोसळल्यानंतर काही वेळातच अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. एनडीआरएफचे पथक आणि प्रशासनाकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले.

### मेडीकल कॉलेजवर कोसळले विमान

विशेष म्हणजे विमानाचा अपघात इतका भयंकर होता की, अहमदाबादच्या बे.जे. मेडिकल कॉलेजच्या इमारतीवर हे विमान कोसळले असून तेथील हॉस्टेलवर जेवण करणाऱ्या भावी डॉक्टरांना भरल्या ताटावरुन उठवण्याचे काम ह्या दुर्घटनेनं केले. या दुर्घटनेचे काही फोटो समोर आले असून पोटात कालवणारी, अत्यंत हृदयद्रावक ही घटना आहे. तीन डॉक्टरांचाही मृत्यू झाले असून येथील ४५ डॉक्टर जखमी झाल्याची माहिती आहे.

### ब्रिटनच्या पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्याकडून देखील एअर इंडिया दुर्घटनेसंदर्भात ट्विट करण्यात आलं आहे. लंडनकडे जाणाऱ्या आणि अनेक ब्रिटिश नागरिकांसह अहमदाबादमध्ये अपघातग्रस्त झालेल्या विमानाचे फोटो आणि व्हिडिओ पाहून मला धक्का बसला आहे. या विमानात ब्रिटनचे 53 नागरिक प्रवास करत होते. सर्व प्रवाशांसोबत माझ्या सहवेदना असून परिस्थितीवर मी लक्ष ठेऊन आहे, अपडेट घेत आहे, असेही पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी म्हटलं.

## विश्वास कुमार रमेश बचावले



या अपघातात एकच व्यक्ती वाचला आहे त्याचे नाव विश्वास कुमार रमेश असून ते एक ब्रिटिश नागरिक आहेत. काही दिवसांसाठी भारतात आपल्या कुटुंबाला भेटण्यासाठी आला होता आणि आपल्या भाऊ अजय कुमार रमेश याच्यासोबत परत यूकेला जाणार होता. रुग्णालयाच्या वॉर्डमधील एका खाटेवर ४० वर्षांचे विश्वास कुमार रमेश झोपलेले आहेत. त्यांनी सांगितले की ते या भीषण अपघातातून बचावले. "टेक-ऑफनंतर तीस सेकंदात मोठा आवाज झाला आणि लगेच विमान कोसळले. हे सगळं खूपच पटकन घडलं," असे विश्वास यांनी सांगितले, त्यांना छाती, डोळे आणि पायांवर अपघातामुळे जखमा झाल्या आहेत.

"जेव्हा मी उठलो, तेव्हा माझ्या आजूबाजूला सर्वत्र मृतदेह होते. मला खूप भीती वाटली. मी उठून धावलो. माझ्या सभोवताली विमानाचे तुकडे विखुरलेले होते. कोणीतरी मला पकडून रुग्णवाहिकेत बसवले आणि रुग्णालयात आणले," असे विश्वास यांनी सांगितले. विश्वास यांनी सांगितले की ते गेली २० वर्षे लंडनमध्ये राहत आहेत आणि त्यांची पत्नी व मुलगाही लंडनमध्येच राहतात. त्यांनी सांगितले की त्यांचा भाऊ अजय विमानात वेगळ्या रांगेत बसलेला होता. "आम्ही दिवला भेट दिली होती. तो माझ्यासोबत प्रवास करत होता आणि आता तो सापडत नाहीये. कृपया मला त्याचा शोध घेण्यास मदत करा," असे त्यांनी भावुकतेने सांगितले. रुग्णालयाच्या इतर भागात, एअर इंडिया विमानात प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे नातेवाईक आणि मित्र आप्तजनांचा शोध घेत होते.

## कॅप्टन सभरवाल यांचा विमान उड्डाणाचा होता ८२०० तासांचा अनुभव

अहमदाबादमध्ये गुरुवारी दुपारी लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाइट AI171 या विमानाचा भीषण अपघात झाला. टेकऑफनंतर अवघ्या काही सेकदांमध्ये ही दुर्घटना घडली. या विमानात एकूण २४२ प्रवासी होते. यामध्ये दोन वैमानिक आणि १० केबिन क्रू सदस्यांचा समावेश होता, अशी माहिती नागरी उड्डाण महासंचालनालयाने ( डीजीसीए) दिली.

'डीजीसीए'च्या माहितीनुसार, लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाइट AI171 या विमानाचे कॅप्टन सुमित सभरवाल होते. त्यांच्यासोबत सहवैमानिक क्लाइव्ह कुंदर हे को-पायलट होते. कॅप्टन सभरवाल यांचा विमान उड्डाणाचा ८२०० तासांचा अनुभव होता. तर सहवैमानिक कुंदर यांचा ११०० तासांचा अनुभव होता. विमानाने टेकऑफनंतर लगेचच एअर ट्रॅफिक कंट्रोल ( ATC) ला 'Mayday' कॉल दिला. मात्र, त्यानंतर ATC च्या कोणत्याही कॉलला प्रतिसाद दिला गेला नाही, अशी माहिती 'डीजीसीए'ने दिली.

**'मेडे' कॉल म्हणजे काय ?**

मेडे कॉल म्हणजे अत्यंत आपत्कालीन परिस्थितीत दिला जाणारा सिग्नल किंवा संदेश होय. याचा उपयोग विशेषतः वैमानिक (पायलट), नौदल अधिकारी अत्यंत संकटात असताना करतात.विमानाला गंभीर समस्या असल्यास विमानाद्वारे मेडे कॉल केला जातो. हा कॉल फक्त जिविताला धोका असेल तरच वापरावा लागतो.

## महाराष्ट्र सरकार सर्वतोपरी मदतीसाठी सज्ज- मुख्यमंत्री


मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

अहमदाबाद-लंडन आंतरराष्ट्रीय विमानाचा झालेला भीषण अपघात हृदय हेलावणारा असून, हा देशासाठी आणि हजारो कुटुंबियांसाठी अत्यंत शोकाचा प्रसंग असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल तीव्र शोकसंवेदना व्यक्त करत, महाराष्ट्र सरकारकडून सर्व यंत्रणांना सज्जतेचे निर्देश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "या अपघातात अनेकांनी आपले घरचे कर्ते, प्रियजन गमावले आहेत. ही घटना काळाने घातलेली झडप आहे. या कठीण प्रसंगी महाराष्ट्राची संपूर्ण जनता दु:खात सहभागी असून, पीडितांना सावरण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना आहे."

या भीषण दुर्घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तातडीने दखल घेतली असून, राहत व मदतकार्यासाठी केंद्र आणि गुजरात सरकार सक्रिय झाले आहे. त्यात महाराष्ट्र सरकारही पूर्ण पाठबळ देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "जखमींना तातडीने दर्जेदार वैद्यकीय मदत मिळावी, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक ते सर्व सहाय्य मिळावे, यासाठी महाराष्ट्रातील सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्यात आले आहे. गरज पडल्यास वाहतूक, आरोग्यसेवा, समुपदेशन आणि मदतनिधी अशा सर्व बाजूंनी मदत करण्यात येईल." या दुर्घटनेने देशभरात हळहळ व्यक्त केली जात असून, या काळरात्रीतून सावरण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्नशील राहील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.



## मृतांची ओळख पटवण्यासाठी नातेवाईकांचे डीएनए नमुने घेतले जाणार

आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव धनंजय द्विवेदी यांनी सांगितले की, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांचे डीएनए नमुने घेण्यासाठी अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमधील बी. जे. मेडिकल कॉलेजच्या मध्ये मृतांच्या जवळच्या नातेवाईकांसाठी डीएनए नमुने देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रक्रियेत विशेषतः आई-वडील किंवा संतती यांचे डीएनए नमुने घेतले जातात.

## टाटा ग्रुपकडून मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटींची मदत

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

अहमदाबाद विमान दुर्घटनेत एअर इंडियाच्या बोईंग 171 फ्लाईटमधील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून सुदैवाने १ प्रवासी बचावला आहे. अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी घटनेनं देश शोकसागरात बुडाला असून २४१ प्रवाशांच्या कुटुंबीयांवर आणि नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. एअर इंडिया ही कंपनी टाटा ग्रुपने घेतल्याने या विमान दुर्घटनेनंतर टाटा ग्रुपकडूनही दु:ख व्यक्त करण्यात आलं आहे. अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत आणि सामाजिक जाणीव ठेऊन टाटा ग्रुपने विमान दुर्घटनेतील जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्च देखील टाटा ग्रुपकडूनच करण्यात येणार असून आवश्यक ती सर्व काळजी आणि मदत जखमींना मिळेल, असे टाटा ग्रुपने म्हटले आहे. तर, विमान अपघातात कोसळलेल्या अहमदाबादमधील बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या बांधकामात मदत करण्याचे आश्वासनही टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांच्याकडून देण्यात आले आहे.



# एचएएलच्या सीएसआर फंडातील अग्निशमन वाहनाचे लोकार्पण

## ओझरच्या घनकचऱ्याचा प्रश्न लवकरच मार्गी लावू : आ. दिलीप बनकर

**ओझर ।** निफाड तालुक्याचे आमदार दिलीप बनकर यांच्या विशेष प्रयत्नातुन एचएएल तर्फे एचएएलच्या सीएसआर निधीतून ओझर नगरपरिषदेला अग्निशमन दलाचे अत्याधुनिक वाहन देण्यात आले आहे. या अग्निशमन वाहानाचे लोकार्पण आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ओझरच्या नागरिकांचा धनकचऱ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावू असे प्रतिपादन आमदार दिलीप बनकर यांनी केले.



येथील खंडेराव महाराज मंदिराजवळ झालेल्या लोकार्पण कार्यक्रमाच्या वेळी आ. बनकर बोलत होते. व्यासपीठावर एचएएलचे उपमहाव्यवस्थापक श्रीशैलम, एचआर विभागाचे अधिकारी त्रिविक्रम, जयचंद नायर ओझर मर्चेंट बँकेचे चेअरमन राजेंद्र शिंदे, ओझर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी किरण देशमुख, उपमुख्याधिकारी स्वेहा फडतरे, एचएएल कामगार संघटनेचे अध्यक्ष अनिल मंडलिक, सरचिटणीस संजय कुटे आदी उपस्थित होते. प्रारंभी बनकर यांनी अग्निशमन वाहनाचे पुजन केले, त्यानंतर वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आमदार बनकर, मुख्याधिकारी किरण देशमुख व त्रिविक्रम यांनी आपापले मनोगत व्यक्त केले. ओझर मर्चेंट बँकेचे उपाध्यक्ष प्रवीण लढ्ढा, संचालक विजय शिंदे, शरद सिन्नरकर, रऊफ पटेल, संजय सोनवणे, ओझर नगरपरिषदेचे अभियंता राहुल शिंदे, केऊर राय, अनिल बोरसे, साधना ढेपले, जयश्री मोगल, साधना खराटे, प्रतीक उंबरे, अविनाश गवळे, किशोर रासकर कॅनाल बागाईतदार संघाचे उपाध्यक्ष नंदकुमार कदम, शिवतेजचे संस्थापक भारत पगार, दिलीप कदम, दिक्षिचे माजी उपसरपंच डॉ. योगेश्वर चौधरी, धोंडीराम पगार, रमेश मंडलिक, गोविंद सिन्नरकर, संजय गवळी, प्रशांत अक्कर, संतोष चौधरी, कैलास शिंदे, जुनेद शेख, विनोद जाधव, आदित्य पगार, पुंडलिक गवळी, अरुण रास्कर, शरीफ खाटीक आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय जि- चॅम्प अबॅकस स्पर्धेत देवळा येथील विद्यार्थ्यांचे सुयश

**देवळा ।** जी-चॅम्प अबॅकस द्वारे ७ जुन रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत येथील स्वामिनी क्लासेस जी - चॅम्प अबॅकस शाखेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. राज्यस्तरीय अबॅकसची स्पर्धा ७ जुन रोजी छत्रपती संभाजी नगर येथील एमआयटी कॉलेजच्या कॅम्पस मंथन हॉल येथे घेण्यात आली होती. त्या स्पर्धे मध्ये योगेश उंबरकर व हेमलता उंबरकर यांच्या स्वामिनी क्लासेस जी - चॅम्प अबॅकस क्लासच्या एकूण १९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन सहभाग घेतला होता. त्यापैकी रुपक आहेर हा ऑनलाईन मध्ये तर गणेश पगार व शिव हिरे हे ऑफलाईन स्पर्धेमध्ये "जी - चॅम्प सुपर स्टार" चे मानकरी ठरलेत.



तसेच आराध्या आहेर, रियांश निकम व रूपक आहेर या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन स्पर्धेत प्रथम क्रमांक तर रुजूला वाघ याने ऑफलाईन दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहेत. २८ मे रोजी झालेल्या ऑनलाईन स्प्रधेमधे अर्पित पटेल, योगेश सोनावणे, रुजूला वाघ यांनी तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकाविले आहे. तर अर्णव विजय आहेर, अर्णव शैलेश आहेर, देवेश मेतकर, नुपूर अंकाईकर, शौर्य मेतकर या विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक मिळविले. हेमलता उंबरकर यांना २०२५ चा बेस्ट टीचर अवॉर्ड देखील मिळाला. व सर्व फ्रांचासी मधून बेस्ट फ्रंचासी सन्मान चिन्ह हेमलता उंबरकर व योगेश उंबरकर यांना जी - चॅम्प चे संचालक योगेश देशमाने व आरती देशमाने ह्यांचा हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. मुलांमधील एकाग्रता, बौद्धिक विकास आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी खरोखरच जी-चॅम्पचा अभ्यासक्रम हा अतिशय उपयुक्त ठरला आहे, असे मत हेमलता उंबरकर यांनी व्यक्त केले.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींनी केले वारकऱ्यांचे स्वागत!

**त्र्यंबकेश्वर ।** निवृत्तीनाथ महाराजांची दिंडी त्रंबकेश्वर येथून पंढरपूरला आषाढी एकादशी निमित्त जात असताना महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला मुलींनी व शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीने आधार तीर्थ आश्रमा जवळ सर्व वारकऱ्यांचे स्वागत केलं. सर्वांची चहापाण्याची व्यवस्था केली. पालखी साठी सर्व मुला -मुलींनी रांगोळी काढली व फुलांची उधळण केली. सर्व मुलींनी निवृत्तीनाथ चरणी प्रार्थना केली.

हे निवृत्ती राया खूप पाऊस पडू दे, बळीराजाला सुखी होऊ दे व आमच्यासारख्या शेतकऱ्यांच्या मुलांना इथून पुढे अनाथ, निराधार करू नको. ही निवृत्तीनाथ चरणी मनोभावे प्रार्थना केली. सर्व वारकरी हे शेतकरी असल्यामुळे सर्वांना एकच संदेश दिला.



आमच्या मायबापांनो कोणत्याही प्रकारच व्यसन करू नका. कर्म ही पूजा आहे. आमच्या वडिलांनी जी चूक केली ती चूक तुम्ही करू नका. आत्महत्या करू नका. आत्महत्या पर्याय नाही. आपल्या मुलाबाळांना खूप शिकवा. आपल्या मुलाबाळांमध्ये भगवंत बघा.

वारीला जात असताना तीर्थक्षेत्र खराब करू नका. इतरांना कमी लेखू नका व सर्वांच्या चेहऱ्यावर हसू, आनंद आणण्याचा प्रयत्न करा. हाच भगवंताचा संदेश आहे. हाच संदेश मुलांनी सर्व वारकऱ्यांना दिला. सर्व वारकऱ्यांनी मुला-मुलींना हसत हसत साद दिली. सर्व मुलांनी एक अभंग घेतला.

**धन्य धन्य निवृत्ती राया ।**
**काय महिमा वर्णावा ।।**
**शिव अवतार तूच धरुनी ।**
**गेले केले त्रिलोकीपावन ।।**

# पंढरी महाराज सहाणेंना वारकरी 'सेवाभाव पुरस्कार' जाहीर



**बेलगाव कुऱ्हे ।** वारकरी संप्रदायामध्ये गेल्या ३५ वर्षापासून निष्कामतेने सेवा देणारे साकुरचे हभप पंढरीनाथ सहाणे यांना 'सेवाभाव पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे.

बेलूतील जगदगुरु तुकाराम महाराज अध्यात्मिक व शैक्षणिक गुरुकुलच्या १४ जूनला होणाऱ्या वर्धापनदिनानिमित्त जगद्गुरु द्वाराचार्य महामंडलेश्वर डॉ. रामकृष्णदास लहवितकर, समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या हस्ते त्यांना सन्मानपूर्वक गौरवण्यात येणार असल्याचे आयोजक ज्ञानेश्वर माऊली तुपे, भागवताचार्य महेश महाराज तुपे यांनी सांगितले. दिव्यांग असूनही सहाणे महाराज तालुक्यातील होतकरू मुलांना हरिपाठ, गायन, वादन, पठण आदी कोणत्याही प्रकारचे मानधन अथवा दक्षिणा न घेता शिकवतात. गरीब होतकरू मुलांना कपडे तसेच वारकरी साहित्य घेण्यासाठी पदरमोड करून वस्तू घेऊन देण्यास त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. आतापर्यंत त्यांनी सातशे पेक्षा जास्त मुलांना वारकरी शिक्षण देण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तालुक्यातील प्रसिद्ध कीर्तनकार,भजनी मंडळांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

# शहरात जंतुनाशक धूर फवारणी करावी : ॲड. आहिरे

**मनमाड ।** शहरातील प्रत्येक प्रभागात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने जंतुनाशक धुर फवारंनी करावी अशा मागणीचे निवेदन नगरपालिकेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने रिपाईचे शहर सचिव ॲड.प्रमोद पांडूरंग आहिरे यांनी दिले आहे.



मनमाड शहरात अवकाळी पाऊस झाल्यानंतर जागोजागी असलेला घाण कचरा आणि खड्डे यामध्ये साचलेले पाणी यामुळे मोठ्या प्रमाणात डास झाल्याने साथीचे आजार पसरले आहे त्यामुळे शहरातील नागरिक हैराण झाले असल्याने आणि सध्या पावसाचे दिवस चालू आहे.त्यामुळे अनेक मोकळ्या मैदानात झाडी,झुडप आणी गवत वाढलेले आहे अनेक ठिकाणी लहान,मोठे खड्डे आहे.त्यात घाण,कचरा आणि पाणी जमा होऊन तळे तैयार झाले आहे. अश्या ठिकाणी मच्छरांची पैदास वाढ होऊन अनेक नागरिक परेशान झाले आहे.आणि अश्या डांसांमुळे नागरीकांना साथीच्या आजाराने ग्रासले आहे.त्यामुळे अनेक दवाखाने हे मलेरिया,चिकन गुनिया अश्या साथीच्या आजाराचे रुग्ण वाढले असून डायरेरियाचे देखील रुग्ण आढळलेले आहे.तरी सदर बाबत आपण तत्काळ दखल घेऊन यावर संबंधीत विभागांना कार्यवाही तातडीने आदेश द्यावेत व जंतू नाशक धुर फवारणी व किटकनाशक फवारणी त्वरीत करण्यात यावी अशी मागणी रिपाईच्या वतीने सचिव ॲड. प्रमोद पांडुरंग आहिरे यांनी केली आहे.

# येरे येरे पावसा, जगव ना आम्हांला!

**लखमापूर ।** हवामान तज्ज्ञ म्हणजे समाजाला बावळट बनवतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या वर्षी धो धो पाऊस आला, मान्सुन पण आला, पाच दिवस, तिन दिवस आधी आला असे मधाचे बोट लाऊन बनवा बनवी केली. मे मधील अवकाळी शेतकऱ्यांची वाट लावणारा बरोबर आला. पण जुन लागताच आज उद्या करता करता तो काही आला नाही. काही भागात धो धो कोसळला. पण तो मान्सुन समजायला भिती वाटते. अनेक धरणात पाणी साठा वाढला. पण खरीप पेरणीचे काय?



१० ते १५ जुन पर्यंत केलेली खरीप पेरणी बऱ्यापैकी उतारा देते म्हणजे एकरी उत्पादन वाढते. मे मध्ये काहींनी पेरण्याचे धाडस केले, त्यांचे नुकसान होऊन दुबार पेरणी करावी लागु शकते. अनुभवी शेतकरी बरोबर अंदाज सांगतात. मे मध्ये धो धो पाऊस असतांना शेतकरी म्हणायचे तज्ज्ञ घाला खड्यात, जुन मध्ये फसवणुक होणार, पाऊस लवकर येणार नाही व ते खरे ठरत आहे. आता पण अनेक खाजगी सरकारी संस्थांसह अनेक तज्ज्ञ अंदाज देतात, पण फसवणुकच होते. काही तज्ज्ञ तर आवरा आवरा, शेतमाल आवरा, गुरढोरं आवरा, आला आला, भयंकर मोठे वादळ व गावच्या गाव वाहुन नेणारा पाऊस येणार आहे, बिचारे शेतकरी व जनता विश्वास ठेवते व आवरा आवर करते पण कशाचा पत्ता नसतो. या लोकांवर बंदीच घातली पाहिजे.

कांद्याचा दर बरा वाढु लागला पण आद्रतेमुळे व पावसाने थोडा फार ओला झाल्याने चाळीतील कांदा वेगाने सडत आहे. म्हणजे भाव आहे पण कांदा नाही म्हणजे संपला खेळ. या तज्ज्ञांनी केलेल्या 'बकवास'मुळे अनेकांनी रब्बी वेळेवर होईल म्हणुन मका, मुग, सोयाबिन सारखी पिके ओल असल्याने पेरून टाकली. पण ते बहुदा 'हे राम' म्हणायची शक्यता आहे. पाऊस जोरात येणार हे सांगणारे तज्ज्ञ पेरणी करू नका असा सल्ला देऊन दुतोंडी वागतात. कृषी खाते मात्र पेरू नका वारंवार सांगत होते, पण ऐकत कोण? एकंदरीत शेतकरी यंदा पण संकटातच राहील, असे वाटत आहे.

# बच्चू कडूंच्या अन्नत्याग आंदोलनाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पाठिंबा : कुबेर जाधव

**देवळा ।** प्रहार शेतकरी संघटनेचे नेते तथा अनाथांचे नाथ बच्चू कडू यांनी सत्ताधारी राज्यकर्त्यांच्या विरोधात बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुर करून चार दिवस उलटले आहेत. गेंड्याच्या कातडीच्या सरकारला अजुनही जाग येत नाही. ज्यांनी आश्वासन दिले ते निवडणुक जुमला होता असे म्हणत शेतकरी कर्जमुक्तीची खिल्ली उडवत आहेत. माजी खासदार राजु शेट्टी यांनी बच्चू कडूंसोबत संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात जाऊन संपूर्ण कर्जमाफी मिळाली पाहिजे म्हणून शेतकऱ्यांचे जन आंदोलन उभे केले आहे, अशी माहिती शेतकरी संघटनेचे नेते कुबेर जाधव यांनी दिली.

अनेक वेळा रस्त्यावर उतरूनही सरकार या बाबतीत निर्णय घेत नाही म्हणून माजी मंत्री कडू यांनी गुरुकुंज मोझरी जिल्हा अमरावती येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाला पसात दिवस झाले आहेत. या लक्षवेधी आंदोलनात प्रहार शेतकरी संघटनेने सत्ताधाऱ्यापुढे १७ प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. त्यामधील प्रमुख मागणी शेतकऱ्यांना सम्पूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे. निवडणुकीच्या काळात सरसकट ३ लाखा पर्यंतची कर्जमाफी देऊ असे आश्वासन देऊन या सत्ताधारी मंडळीने शेतकऱ्याची मते घेतली व सत्तेवर आले. आज सरकारकडे पैसे नाहीत हे सांगत शेतकऱ्यांना कर्जमाफी नाकारली गेली आहे. ही शेतकऱ्यांची घोर फसवणूक असून याविरोधात दि ९ जुन पासून प्रहार शेतकरी संघटना व प्रहार जनशक्ती पक्ष आंदोलन करत आहे. या कर्जमाफी आदोलनाला नाशिक जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जाहीर पाठिंबा दर्शविला असून सरकारने या आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन शेतकरी कर्जमाफी जाहीर करावी. संघटनेचे अध्यक्ष निवृत्ती गारे पाटील, समन्वयक कुबेर जाधव आदींसह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शवित मागणी केली.

# शेरीत पेरणी केलेल्या मका बियाणांची रानडुकरांकडून नासाडी

**देवळा ।** शेरी (ता. देवळा) येथे पेरणी केलेल्या मका बियाणांची रानडुकरांकडून नासधूस होत असल्याने शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली असून वन विभागाने यांची दखल घेऊन या रानडुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.



तालुक्यात सध्या खरीप हंगामाची लगबग सुरु असून तालूक्यातील पश्चिम भागात गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर खर्डे परिसरात बहुतांश शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करून पेरणीला सुरुवात केली. यात मक्याची पेरणी जास्त प्रमाणात दिसून येत आहे. त्यात शेरी येथील शेतकरी आनंदा शिवाजी पवार यांनी आपल्या शेतात मक्याची पेरणी केली. पेरणी केलेल्या शेतात रानडुकरांकडून नासाडी करण्यात आल्याने शेतकरी भयभीत झाला आहे. या परिसरात रानडुकरांचा मुक्त संचार वाढला असून, पेरणी केलेले बियाणे शेतातून उकरून काढत असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. वन विभागाने याची दखल घेऊन या रानडुकरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी खर्डेसह शेरी, वार्शी, कणकपूर, हनुमंतपाडा व मुलूखवाडी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

> पेरणीयुक्त पाऊस झाल्यांमुळे महागडे मक्याचे बियाणे खरेदी करून, गेल्या दोन दिवसापूर्वी त्यातील एका मक्याची पिशवीची पेरणी केली. याबरोबर रासायनिक खत देखील वापरले असून ते बियाणे शेतात उगवले की नाही ते पहाण्यासाठी गेल्यावर याठिकाणी रानडुकरांनी पेरलेले सम्पूर्ण बियाणे उकरून काढल्याने नुकसान झाले आहे. वनविभागाने याची दखल घ्यावी.
>
> **- आनंदा पवार, शेतकरी, शेरी (ता. देवळा)**

## ➤ महत्त्वाचे

### सहयाद्री मित्र संमेलनानिमित्त १५ ला ब्रह्मागिरी स्वच्छता अभियान

**नाशिक ।** नाशिकमध्ये डोंगर भटकंती करणाऱ्या राज्यातील गिऱ्यारोहकांसाठी ५ व ६ जुलै रोजी कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉल येथे आयोजित करण्यात आले असून, संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. या वर्षी संमेलना निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वच्छ सहयाद्री आणि वणवामुक्त सहयाद्रीचा संदेश देण्यासाठी सहयाद्री मित्र संमेलनानिमित्त ब्रह्मगिरी (दुर्ग भांडार) या दुर्गावर स्वच्छता अभियान दि. १५ जून रोजी राबविण्यात येणार आहे. यासाठी येण्या जाण्यासाठी बसची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. संस्थेतर्फे गार्बेज बॅग आणि हॅन्ड ग्लोज देण्यात येणार आहे. या स्वच्छता अभियानात सहभागी घेण्यासाठी संदीप काकड -9326145581 यांच्याशी संपर्क साधावा, असे आव्हाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# ३८ वर्षांनी पुन्हा एकत्र आले सौंदाणेचे विद्यार्थी

## आठवणींना उजाळा देत ऋणानुबंध केले घट्ट

**एकलहरे ।** सौंदाणे येथील जनता विद्यालयातील सन १९८६/८७मध्ये इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा विद्यालयाच्या आवारात शनिवार, दि. ३१ मे रोजी उत्साहात झाला. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या सहाध्यायींची भेट घेत ऋणानुबंध घट्ट केले. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक ए. व्ही. देवरे होते.

याप्रसंगी तत्कालीन शिक्षक श्रीराम पवार, एस. आर. ठोके, एस. जी. शेवाळे, एकनाथ देसले, विद्यमान मुख्याध्यापक चव्हाण शिपाई पवार व्यासपीठावर उपस्थित होते. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर स्वर्गीय माजी विद्यार्थी निवृत्ती रतन पवार, माजी सैनिक वाके यांच्यासह इतर दिवंगत माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मेळाव्यास तत्कालीन सर्व शिक्षक वृंद, दहावीच्या अ ब क तुकड्यांमधील माजी विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांनीच आम्हाला घडवले, चांगले संस्कार केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.




कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंकज कोचर, जगदीश निकम, भास्कर पवार, अरुण पवार, दत्तू कारवाळ, शोभा पवार, किशोर पवार, प्रमोद बच्छाव, सुनीता पगारे, तिलोत्तमा पवार, जयश्री गायकवाड, कमल देवरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अरुण पवार यांनी केले. एस. जी. शेवाळे यांनी समाजाप्रती असलेले ऋणही वेळोवेळी सामाजिक उपक्रम राबवून फेडत असल्याचे बघून धन्य झाल्याची भावना व्यक्त केली.

या विद्यार्थ्यांचा सहभाग माजी विद्यार्थी भरत पवार, पंकज कोचर, अरुण पवार, जगदीश निकम, दत्तू कारवाळ भास्कर पवार, किशोर पवार, भाऊसाहेब पवार, मनीषा जाधव, शोभा देवरे, जितेंद्र पगार, प्रमोद बच्छाव, रमेश सोनवणे, दीपक बिल्लाडे, हरेश्वर बागूल, सुनीता पगारे, पुष्पा पवार, ललिता देवरे, संतोष पवार, विजय पिंगळे, शैलेश आहेर, सतीश खैरनार, सुनील पवार, राजेंद्र पवार, श्याम पवार, सुरेश पवार, किरण अहिरराव, नानासाहेब पवार, सुनीता आहेर, मंगला सूर्यवंशी, उषा शिंदे, छाया थोरात, मनीषा पवार, रघुनाथ पवार, नानासाहेब पवार, सुनीता पवार, विमल देवरे, मंगल सावंत, देवीदास पगार, संगीता पवार, अनिता पवार, उषा पवार आदींनी आठवणींना उजाळा दिला.

# सिव्हिल हॉस्पिटलमधील औषध खरेदीचे दस्त 'महासागर'च्या हाती

## थक्क करणारी आकडेवारी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भ्रष्टाचाराचा भस्मासूर?












**नाशिक ।** सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषध खरेदीत होत असलेल्या गैरव्यवहाराला वाचा फुटल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. सिव्हिल हॉस्पिटल मार्फत खरेदी केल्या जाणाऱ्या औषधांचे दस्तावेज दै. 'महासागर'च्या हाती आले असून यातील औषध खरेदीच्या आकडेवारीत असलेली तफावत थक्क करणारी आहे. यातूनच सिविल सर्जन यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा फाटला असून रुग्णसेवेसाठी असलेल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भ्रष्टाचाराचा भस्मासुर पोसला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे गोरगरिबांसाठी खरेदी केलेल्या औषधांचा वाढीव पैसा नेमका कुणाच्या घशात जात आहे असा सवाल उपस्थित केला जात आहे.

सिव्हिल हॉस्पिटलच्या औषध खरेदीमध्ये सिव्हिल सर्जन शिंदे यांना ५० टक्के मलिदा दिला जातफ असल्याचा आरोप तक्रारदार पुखराज जैन यांनी केला आहे.त्यामुळे सिव्हिल हॉस्पिटल मधील औषध खरेदीचा मुद्दा सध्या वादात सापडला आहे. ५० टक्क्याचा मलिदा वरपल्यानंतरही औषध खरेदी चढ्या भावाने केली जात असल्याने सदरची वाढीव रक्कम नेमकी कुणाच्या घशात जाते असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संबंधित कागदपत्रे दै. 'महासागर'च्या हाती लागले असून संदर्भ सेवा रुग्णालयात दहा रुपयांना घेतलेली तिच औषधे औषधे सिव्हिल हॉस्पिटल मध्ये मात्र वीस रुपये दराने घेतली जात आहे. चढ्या भावाने औषध खरेदीचा मुद्दा गंभीर असताना वरिष्ठ अधिकारी मात्र मूग गिळून बसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. संदर्भ सेवा रुग्णालय आणि सिव्हिल हॉस्पिटल यामध्ये केवळ ५०० मीटरचे अंतर असून या छोट्याशा अंतरात औषधांच्या किमती दुपटीने वाढल्याने वाढीव किंमत नेमकी कुणाच्या आदेशाने टाकल्या जातात याची चौकशी करणे गरजेचे असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. यातील आणखी गंभीर बाब म्हणजे गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या ब्लॅक लिस्ट गेटवेल डिस्ट्रीब्यूटर या कंपनीलाच औषध पुरवठ्याचा ठेका देण्यात आलेला आहे. त्यामुळे या या प्रकारामागे सिव्हिल सर्जन शिंदे यांची भूमिका आता तपासणे गरजेचे असल्याचे बोलले जाते. सिव्हिल हॉस्पिटल मध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराला येथील काही अधिकारी आणि कर्मचारी अक्षरशः त्रस्त झाले असून शिंदेंच्या काळात सिव्हिल हॉस्पिटल मधील भ्रष्टाचार वाढल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे



शिंदे यांची बदली करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**जिल्हा शासकीय रुग्णालया-संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास दै. महासागर, 0253- 4513384 यावर संपर्क साधावा.**

### हाती आलेल्या माहितीनुसार एकूण २८० प्रकारच्या वस्तू खरेदी करण्यात आल्या असून त्यातील तफावत पुढीलप्रमाणे :

१) अमिनो ऍसिड आयव्ही
२० एम एल [३१०.१]
पुरवठादार गेटवेल डिस्ट्रीब्यूटर
सिव्हिल हॉस्पिटल दर ४७५.१ रुपये
संदर्भ सेवा रुग्णालय दर २३९ रुपये
फरक- २३६.९६

२) डोबुटामाईन इंजेक्शन-
२५० एमजी ५ एमएल [१७२.१]
पुरवठादार गेटवेल डिस्ट्रीब्यूटर
सिव्हिल हॉस्पिटल दर २४.८१ रुपये
संदर्भ सेवा रुग्णालय दर २ रुपये
फरक २१.८१

३) मेफेंटरामाईन इंजेक्शन ३५ एमजी
१० एमएल एलव्हीआयएएल
पुरवठादार- गेटवेल डिस्ट्रीब्यूटर
सिव्हिल हॉस्पिटल दर- ३०७.६९ रुपये
संदर्भ सेवा रुग्णालय- 51 रुपये
फरक- २५६.६९

४) प्रोपोफॉल इंजेक्शन १%(१०एमजी)
२० एमएल व्हीआयएएल (५.१)
पुरवठादार गेटवेल डिस्ट्रीब्यूटर
सिव्हिल हॉस्पिटलचे दर २२९.८१ रुपये
संदर्भ सेवा रुग्णालयाचे दर- ३६.६५ रुपये
फरक- ९३.१६

सिव्हिल हॉस्पिटलमधील गोरगरीब रुग्णांसाठी वापरला जाणारा ऑक्सिजन सिलेंडर देखील चढ्या भावाने खरेदी केला जात असून संदर्भ सेवा रुग्णालयात ४९५ रुपयांना खरेदी केलेला ऑक्सिजन सिलेंडर सिव्हिल हॉस्पिटल मध्ये मात्र ७०० रुपयांच्या आसपास खरेदी केला जात आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून या प्रकरणाची देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

या गंभीर प्रकरणी प्रस्तुत प्रतिनिधीने जिल्हा शासकीय रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांची कुठलीही प्रतिक्रिया मिळाली नाही. किंबहुना व्हाट्सपच्या माध्यमातून त्यांना संदेश देऊन प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अप्रत्यक्षरीत्या प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली.

# मंत्री संजय शिरसाटांची त्र्यंबकेश्वरमध्येही जमीन

**नाशिक ।** दीड वर्षापूर्वी मंत्री संजय शिरसाटांनी त्र्यंबकेश्वरमध्येही जमीन विकत घेतल्याची माहीती हाती आली आहे. खरेदी केलेल्या या जमिनीचे मूल्य १४ ते १५ कोटी रुपये असल्याची माहिती समोर येत असून, या जमीन व्यवहारामुळे मंत्री शिरसाटांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

मंत्री शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर येथील 'शेंद्रा एमआयडीसी'मध्ये नियम डावलून सहा कोटींचा भूखंड घेतल्याचा तसेच ११० कोटींचे हॉटेल विट्स लिलाव प्रक्रियेतून अवघ्या ६७ कोटींमध्ये घेतल्याचा आरोप होत असतानाच, आता त्र्यंबकेश्वरजवळील जमीन प्रकरणामुळे मंत्री शिरसाटांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मंत्री शिरसाट यांनी नाशिक - त्र्यंबक रस्त्यालगत दीड वर्षापूर्वी ४.४६ एकर जागा घेतल्याचे समोर आले आहे. त्यावेळी त्यांनी दोन कोटी रुपयांमध्ये ही जमीन खरेदी केल्याची माहिती समोर



येत असून, जमीन त्यांच्यासह मुलगा तुषार शिरसाट आणि इगतपुरी येथील त्यांचे नातेवाईक प्रशांत रुपवते यांच्या नावे असून, जमिनीच्या सातबाऱ्यावर तिघांच्याही नावांची नोंद आहे. सध्या या परिसरात एकरी तीन कोटींचा भाव असून, त्याप्रमाणे या जमिनीची किंमत १४ ते १५ कोटी इतकी असल्याचे बोलले जात आहे. मंत्री शिरसाट यांनी नाशिकमधील चौघे पार्टनर गुंतवणूकदारांकडून ही जमीन खरेदी केल्याची माहिती समोर येत आहे. या जमिनीला चहूबाजूने सीमेंटच्या फळ्यांचे कपाऊंड उभारण्यात आले असून, प्रवेशद्वारावर 'त्र्यंबकराज' असे नाव आहे. तसेच 'ही जमीन खासगी मालकीची असून, प्रवेशास मनाई आहे' असेही लिहिले आहे. तसेच प्रवेशद्वारावर मंत्री शिरसाट यांचे नातेवाईक प्रशांत रुपवते यांचे नाव व मोबाइल क्रमांक नमूद करण्यात आलेला आहे.

# स्वानंद बेदरकर यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन

**नाशिक ।** 'शब्दमल्हार' प्रकाशन संस्थेचे संपादक आणि प्रसिद्ध व्याख्याते स्वानंद बेदरकर यांच्या 'पावसाच्या गर्भतळी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन रविवार दि. १५ जून २०२५ या दिवशी होत आहे.

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या नवलमल फिरोदिया सभागृहात सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. नाटककार, अभिनेते आणि दिग्दर्शक मकरंद देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होईल. पुस्तकावरील विशेष भाष्य ज्येष्ठ समीक्षक रणधीर शिंदे हे करणार असून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. गेली अनेक वर्ष बेदरकर हे साहित्य-संस्कृती या विषयाशी संबंधित काम करीत असून आजवर वेगवेगळ्या प्रकारची संपादने त्यांच्याकडून झाली आहेत. 'शब्द कल्पिताचे' हा मराठी साहित्य विश्वातील ऐतिहासिक असा पत्रग्रंथ त्यांनी संपादित केला असून आहे. 'पावसाच्या गर्भतळी' या पहिल्याच



कवितासंग्रहात त्यांच्याकडून 'पाऊस' हा विषय केंद्रवर्ती ठेवून सगळ्या कवितांचे लेखन झाले आहे. पावसावर मानवी आरोपन हे या संग्रहाचे वैशिष्ट्य असून वेगवेगळ्या रूपातील पावसाच्या कविता या संग्रहात रसिक वाचकांना वाचायला मिळतील. मराठीतील ख्यातनाम समीक्षक रणधीर शिंदे यांची संग्रहाला प्रस्तावना आहे. सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, आणि व्यक्तिगत स्थितीच्या या कवितांच्या संग्रह प्रकाशनाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन 'शब्दमल्हार प्रकाशन'च्यावतीने करण्यात आले आहे.

## ➤ महत्त्वाचे

### त्र्यंबकेश्वर-इगतपुरी तालुक्यात काँग्रेसला धक्का

**त्र्यंबकेश्वर ।** पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला पाठिंबा देण्यासाठी व मुख्यमंत्री देवेंद् फडणवीस



यांच्या नेतृत्वात विकसित महाराष्ट्रला समर्थन देण्यासाठी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी गटाचे काँग्रेसचे जिल्हा परिषद सदस्य शकुंतला डगळे, इगतपुरीचे माजी सभापती गोपाळराव लहांगे, संतोष डगळे त्यांच्यासह काँग्रेस व उद्धव ठाकरे गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, जलसंपदा तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, संघटन मंत्री रवी अनासपुरे यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष प्रा. सुनील बच्छाव यांच्या नेतृत्वाखाली आज वसंत स्मृती कार्यालय मुंबई येथे भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे तालुकाध्यक्ष सुयोग वाडेकर यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे इगतपुरी त्र्यंबकेश्वर विधानसभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### प्रभाग २३ मध्ये रविवारी करिअर मार्गदर्शन, विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**इंदिरानगर ।** प्रभाग क्रं २३ मधील शिवसेना प्रणित सर्वज्ञ श्री सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने इ. १०वी व इ.१२वीच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ व करियर मार्गदर्शन शिबिर रविवार दि.१५जुन रोजी दु ४ वाजता क्षत्रिय मंगल कार्यालय.श्री श्री रविशंकर मार्ग विजय ममता टॉकीजच्या पाठीमागे आयोजित करण्यात आले आहे. या मार्गदर्शन कार्यक्रमास विद्यार्थी पालक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना नाशिक जिल्हा संघटक योगेश म्हस्के यांनी केले आहे.

# रविवारी वाईल्डट्रॅक्स मॉन्सून क्रॉसओव्हर मोहीम

**नाशिक ।** पावसाळ्याच्या आगमनाबरोबरच साहसी रायडर्स आणि ऑफ-रोड प्रेमींसाठी एक खास संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाइल्ड ट्रॅक मॉन्सून क्रॉसओव्हर या विनामूल्य मोहिमेचे आयोजन रविवार दि. १५ जून रोजी करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजता त्र्यंबकरोडवरील आनंद रिसॉर्ट येथून मोहिमेला सुरुवात होईल. या कार्यक्रमाचे आयोजक जी फोर स्मार्ट रेसिंग टेक्नो असून सुझुकी स्पीड सहआयोजक आहेत.

नाशिककर दूचाकी आणि चार चाकी वाहनधारकांसाठी ही



मोहीम म्हणजे निसर्गाच्या कुशीत रानवाटांवरचा थरारक अनुभव ठरेल! एक साहसी, चिखलाने भरलेला, पाण्याच्या फवाऱ्यांनी ओलाचिंब होणारा प्रवास. आतापर्यंत व्हि स्ट्रॉम, थार , रॉयल एनफिल्ड, एक्सपर्ट आणि इतर वाहनांचा सहभाग नोंदवला गेला आहे. वाईल्डट्रॅक्स ही मोहीम फक्त वाहन चालवण्यापुरती मर्यादित नाही, तर निसर्गप्रेम, साहस, आणि टीमवर्क यांचा संगम ठरेल. प्रत्येक सहभागीला एक अविस्मरणीय अनुभव देण्याचे उद्दिष्ट ठेवून हा उपक्रम आखण्यात आला आहे. इंजिनचा गडगडाट होऊ द्या, साहसाची खरी सुरुवात आता होते! या घोषवाक्याने सर्व रायडर्सना सज्ज राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. रानवाटांवरील धडकी भरवणारे चढ, खोल चिखलातून वाट काढत जाणारे क्षण, आणि निसर्गाच्या सान्निध्यात घालवलेला दिवस. ही मोहीम प्रत्येक सहभागीच्या आठवणीत कोरली जाईल. या अनोख्या आव्हानात्मक मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे. अधिक माहितीसाठी गणेश लोखंडे ९६५७३२५७३३ व मयंक कड ७६६६२१०७८९ यांच्याशी संपर्क साधावा.

# आ. पाटील यांनी अहमदाबाद ते तासगावपर्यंत सर्व प्रवाशांना आणण्याची केली सोय



**नाशिक ।** अहमदाबाद विमानतळावर झालेल्या विमान अपघातानंतर संपूर्ण विमान व्यवस्था कोलमडून गेली. दरम्यान तासगाव तालुक्यातील ४५ प्रवासी माउंट अबू, राजस्थान, साबरमती गुजरात या ठिकाणी सहलीसाठी गेले होते. ते सर्वजण अहमदाबादहुन पुण्याला विमानाने येणार होते. दरम्यान दुपारी अहमदाबाद - लंडन विमानाला झालेल्या भीषण अपघातानंतर विमानतळावरील सर्व वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली. विमानतळावरून विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. तासगाव तालुक्यातील प्रवासी अहमदाबाद विमानतळावर अडकून पडल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदार संघाचे आमदार रोहित पाटील यांना तासगाव मधील प्रवासी अहमदाबाद विमानतळावर अडकल्याची माहिती मिळताच त्यांनी थेट प्रवाशांशी संपर्क साधून त्यांना दिलासा दिला. त्यांना अहमदाबादहुन थेट तासगाव पर्यंत सुखरूप आणण्याची व्यवस्था केली. अहमदाबाद येथील विमान अपघातानंतर धुराचे लोट व विमानतळावर झालेली गडबड पाहून तासगाव मधील प्रवासीही धास्तावले होते. सदर प्रवाशांना आ. रोहित पाटील यांनी दिलासा दिला व त्यांना सुखरूप तासगाव पर्यंत आणण्याची जबाबदारी घेतली. तासगाव मधील सहलीसाठी गेलेले सर्व प्रवासी सुखरूप असून ते उद्यापर्यंत तासगाव मध्ये पोहोचतील, अशी माहिती आमदार रोहित पाटील यांनी दिली. अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघातानंतर तासगाव येथून सहलीसाठी गेलेल्या प्रवाशांना सुखरूप आणण्यासाठी आ. पाटील यांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल सर्व प्रवाशांनी त्यांना धन्यवाद दिले.

### तत्पर लोकप्रतिनिधी असल्याचा पुन्हा प्रत्यय

काही दिवसापूर्वी कवठेमहांकाळ तालुक्यातील कोगनोळी येथील काहीजण कोकणात सहलीसाठी गेली होती. त्यावेळी त्यांच्यावर असाच अडचणीचा प्रसंग आला होता. तेव्हाही आमदार रोहित पाटील यांनी कोकणातील लोकप्रतिनिधींशी संपर्क करून कवठेमहांकाळ तालुक्यातील सहलीला गेलेल्या सर्व युवकांना एस.टी.ची सोय करून सुखरूपपणे कवठेमहांकाळ येथे आणले होते. आजही अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघातानंतर अडचणीत सापडलेल्या तासगाव येथील प्रवाशांना आमदार रोहित पाटील यांनी तितक्याच तत्परतेने सुखरूप तासगाव पर्यंत आणण्यासाठी केलेली व्यवस्था निश्चितच कौतुकास्पद आहे. या दोन्ही प्रसंगातून आ. रोहित पाटील एक तत्पर लोकप्रतिनिधी असल्याचा प्रत्यय आला आहे.

# राज - उद्धव ठाकरेंच्या संभाव्य युतीला ब्रेक?

गत काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाची चर्चा सुरू आहे. पण राज ठाकरे यांनी गुरूवारी सकाळी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमुळे मनसेसोबतच्या युतीसाठी सकारात्मक असणा ?या उद्धव ठाकरे यांना जोरदार झटका बसला आहे. विशेषतः राज ठाकरे आपले बंधू उद्धव यांच्यासोबत युती करणार की भाजपसोबतच राहणार? असा सवालही या निमित्ताने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

------------------

मुंबईतील ताज लँड्स अँड हॉटेलमध्ये आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीसाठी राज ठाकरे प्रथम हॉटेलवर पोहोचले. त्यानंतर अर्ध्या तासातच फडणवीस तिथे पोहोचले. त्यानंतर या दोन्ही नेत्यांत जवळपास दीड तास प्रदिर्घ चर्चा झाली.

त्यात कोणत्या मुद्यांवर चर्चा झाली हे स्पष्ट झाले नाही. पण हे दोन्ही नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र आलेत. त्यामुळे याविषयी वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत.

फडणवीसांच्या वेळापत्रकात भेटीचा उल्लेख नव्हता.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या व्यस्त वेळापत्रकात ताज लँड्स हॉटेलचा कुठेही उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांची राज यांच्यासोबत झालेली ही अनपेक्षित भेट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णायक ठरेल का? विशेषतः ठाकरे गटासोबतच्या संभाव्य युतीला ब्रेक लावून मनसे लोकसभा निवडणुकीसारखाच पुन्हा भाजपला पाठिंबा देणार का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाला भाजपने दिला पूर्णविराम?**

उल्लेखनीय बाब म्हणजे गत काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीची चर्चा सुरू झाली होती. प्रथम राज ठाकरे व त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एकमेकांना टाळी देण्याचे सूतोवाच केले होते. त्यामुळे या चर्चेला अधिकच बळ मिळाले होते. पण आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या राजकीय कौशल्याद्वारे ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीला पूर्णविराम दिल्याचे दिसून येत आहे.



**फडणवीस, शिंदेंशी राज ठाकरेंचे चांगले संबंध**

उद्धव ठाकरे यांचा सत्ताधारी महायुतीमधील भाजप व शिवसेना शिंदे गट या दोन पक्षांना कडाडून विरोध आहे. याऊलट राज ठाकरे यांचे या दोन्ही पक्षांशी चांगले संबंध आहेत.

विशेषतः त्यांचे मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चांगले मेतकुट जमते. हे दोन्ही नेते अनेकदा शिवतीर्थावर येऊन राज ठाकरे यांच्याशी हितगुज करतात. त्यामुळे राज व फडणवीस यांच्या आजच्या भेटीवर उद्धव ठाकरेंचा पक्ष कोणती प्रतिक्रिया देतो? यावर ठाकरे बंधूंच्या पुढच्या मनोमिलनाचे गणित अवलंबून असणार आहे.

**राज ठाकरेंना महायुतीच्या गोटात वळवण्याचा प्रयत्न**

राज ठाकरे व उद्धव ठाकरे या दोघांना मानणारा एक मोठा वर्ग मुंबई, नाशिक, ठाणे या शहरी भागांमध्ये आहे. त्यामुळे हे दोन्ही नेते एकत्र आले तर त्याचा मोठा परिणाम आगामी महापालिका निवडणुकांवर होऊ शकतो.

देवेंद्र फडणवीस नेमकी हीच गोष्ट हेरून राज ठाकरे यांना आपल्या बाजूने वळवण्याचे प्रयत्न सुरू केलेत. ही भेट याच प्रयत्नांचा एक भाग असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या कलानगर येथील मातोश्री निवासस्थानापासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असणाऱ्या ताज हॉटेलमध्ये ही भेट घेतली.

दरम्यान, राज ठाकरे आणि फडणवीस भेटीवर उद्धव ठाकरे गटाकडून प्रतिक्रिया आली आहे . हे बघा राज ठाकरे यांनी त्यांच्या मुलाखती दरम्यान म्हटलं होतं, महाराष्ट्राच्या हितापेक्षा त्यांचा इगो मोठा नाही. त्यानंतर माझ्या पक्षाने, माझ्या प्रमुखांनी सकारात्मकता दाखवली. त्यासाठी आवश्यक असणारी कृती करणारी पावलं उचलली. आता मनसे प्रमुखांच्या मनात काय आहे, हे आपल्याला सांगता येत नाही. मनसे प्रमुखांनी मौन साधलेलं आहे, असं उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या.

मनसे प्रमुखांची आज मुख्यमंत्र्यांशी भेट झाली असेल, तर ती कुठल्या कारणासाठी झाली, ते आपल्याला माहित नाही. त्यांनी कोणाला भेटावं, हा त्यांचा प्रश्न आहे. ते आम्हाला बांधिल नाहीत. ते त्यांचा निर्णय घ्यायला सक्षम आहेत. महाराष्ट्राच्या मनात काय आहे, त्याला अनुसरून निर्णय घ्यायच कि, महाराष्ट्राचे उद्योगधंदे गुजरातला पळवणाऱ्या आणि गुजरातधार्जिणं धोरण अवलंबणाऱ्या फडणवीसांच्या हिताचा घ्यायचा, हा निर्णय राज ठाकरेंना घ्यायचा आहे, असं सुषमा अंधारे म्हणाल्या.

या दोन नेत्यांच्या भेटीमध्ये मुंबई मनपा निवडणूक दडली आहे, एवढे मात्र नक्की.

■ ■ ■

# मोहंमद युनूस यांचे कारनामे!

बांगलादेशच्या अंतरीम सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांचे कारनामे आता हळूहळू बाहेर येऊ लागले आहेत.

त्यांनी आपला पदभार स्वीकारल्यानंतर जी भारत विरोधी भूमिका घेतली ती जगजाहीर आहे. बांगलादेशातील जमाते इस्लामी या कट्टरवादी पक्षाबद्दल युनूस यांना वाटणारी सहानुभूती लपून राहिलेली नाही.

जमाते इस्लामी पक्षाने बांगलादेश स्वातंत्र्य युद्धात पाकिस्तानची बाजू घेतली होती, तसेच पाकिस्तानी सैनिकांनी पूर्व पाकिस्तानातील जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले त्यामध्ये जमाते इस्लामीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी जमाते इस्लामी पक्षावर बंदी घातली होती.मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने काही दिवसांपूर्वी जमाते इस्लामी या पक्षावरील बंदी उठवली आहे. मोहंमद युनूस यांनी मध्यंतरी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची इच्छा प्रकट केली होती.बांगलादेशातील राजकीय पक्ष हे आपल्याला साथ देत नसल्याचे कारण त्यांनी पुढे केले होते.परंतु तो एक बनाव होता. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी आपल्या पाठीशी उभे रहावे,या करता युनूस यांनी ती चाल खेळली होती.



अभय गोखले

विशेषतः माजी पंतप्रधान खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने त्यांना पाठिंबा द्यावा म्हणून युनूस यांनी आपल्या राजीनाम्याचे पिल्लू सोडले होते. युनूस यांनी असे घोषित केले आहे की बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात येतील.

परंतु बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर २०२५ मध्ये घेण्याचा आग्रह धरला आहे.सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर २०२५ मध्ये न घेतल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल,असा इशारा बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने, मोहंमद युनूस यांना दिला आहे त्यामुळे युनूस हे धास्तावले आहेत.

मोहंमद युनूस यांना जास्तीत जास्त वेळ आपल्या पदाला चिकटून रहायचे आहे, आणि त्यांचा हा कावा बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने बरोबर ओळखला आहे. महत्वाचे म्हणजे जमाते इस्लामी या कट्टरवादी पक्षाची अशी इच्छा आहे की मोहंमद युनूस यांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या पदावर रहावे.

मोहंमद युनूस आणि लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्यातील विळ्या-भोपळ्याचे नाते सर्वश्रुत आहे.वकार उज जमान हे माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे नातेवाईक आहेत.त्यामुळे शेख हसीना यांच्याबाबत जमान यांना सहानुभूती असणे स्वाभाविक आहे.जमान हे सेक्युलर आहेत,तर युनूस हे जमाते इस्लामी सारख्या धर्मांध पक्षाबरोबर जवळीक साधून आहेत.

मोहंमद युनूस,जमाते इस्लामी पक्ष,आरक्षण विरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थी नेत्यांनी स्थापन केलेला नॅशनल सिटिझन्स पक्ष या सर्वांना, लष्कर प्रमुख वकार उज जमान हे आपल्या मार्गातील अडथळा वाटत आहेत, त्यामुळे हा अडथळा दूर करण्यासाठी त्यांचे एकत्रित प्रयत्न सुरू आहेत

मार्च महिन्यात, पाकिस्तानी गुप्तहेर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सच्या मदतीने, लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांच्या पदावरुन घालवण्याचा एक प्लॅन बांगलादेश लष्करातील काही अधिकाऱ्यांनी बनवला होता. लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली हा प्लॅन तयार करण्यात आला होता. मात्र हा प्लॅन अयशस्वी ठरला होता. त्यानंतर फैजूर रेहमान यांना नजर कैदेत ठेवण्यात आले होते.

मोहंमद युनूस यांनी आपली खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी जे कारनामे केले त्यापैकी एक कारनामा आता बाहेर आला आहे. स्वराज्य मॅगझिनने दिलेल्या माहितीनुसार युनूस यांनी सीमेवर तैनात असलेल्या बॉर्डर गार्ड बांगलादेश (बीजीबी ) या दलाचा वापर करून आपले स्थान बळकट करण्याचा प्रयत्न नुकताच केला होता.पण लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्या सतर्कतेमुळे तो प्रयत्न अयशस्वी ठरला.

भारत - बांगलादेश सीमेवर दोन्ही बाजूला तैनात असलेल्या बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यात चकमकी घडवून आणायच्या आणि बांगलादेश मध्ये भारत विरोधी वातावरण निर्माण करायचे असा प्लॅन युनूस यांच्याकडून तयार करण्यात आल्याचे बोलले जात होते.

बॉर्डर गार्ड बांगलादेश या दलाने सीमेवर आक्रमक भूमिका घ्यायची आणि भारतीय सीमा सुरक्षा दलाला उचकवायचे अशाप्रकारचा तोंडी निरोप, मोहंमद युनूस यांच्याकडून बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना पाठवण्यात आला होता.

भारतातर्फे पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूरची मोहीम जेंव्हा चालवण्यात आली, ती वेळ या प्लॅन करता निवडण्यात आली होती. बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यात चकमकी झाल्यास, भारतीय लष्कर, ऑपरेशन सिंदूर मध्ये व्यग्र असल्याने, भारतीय लष्कराला तिकडे फारसे लक्ष देता येणार नाही, असा डाव त्यामागे होता.

चकमकी हाताबाहेर गेल्यास बॉर्डर गार्ड बांगलादेशला मदत करण्यासाठी, बांगलादेश लष्कराची काही युनिट्स सीमा भागात तैनात करण्याबाबत विचार सुरू होता. बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यातील संघर्ष वाढल्यास, बांगलादेश मधील जनतेमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत होईल आणि पक्षीय भेदाभेद विसरून बांगलादेश मधील जनता मोहंमद युनूस यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिल, अशी कल्पना त्यामागे होती.

मात्र लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांची कुणकुण लागताच त्यांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना असा वेडेपणा करू नका असे सांगितले.

हे प्रकरण आपल्याला भारी पडेल, यांची जाणीव लष्करप्रमुखांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना करून दिली. तसेच आपल्या शिवाय इतर कोणाचेही आदेश मानू नका अशी सूचना, लष्करप्रमुखांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना केली. मोहंमद युनूस आणि बांगलादेशचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांनाही लष्करप्रमुखांनी अशाप्रकारचे धाडस अंगाशी येऊ शकेल, या गोष्टीची जाणीव करून दिली.

अशा प्रकारे आपली खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी अंतरीम सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांनी जो प्लॅन तयार केला होता, तो ते अमलात आणू शकले नाहीत.

मोहंमद युनूस हे सर्वच बाबतीत अपयशी ठरल्याने,त्यांची चारही बाजूंनी कोंडी होत आहे.आता ते त्यातून कसे बाहेर पडतात ते पहावे लागेल.

# रोज मरे त्याला कोण...

इंडिया कॉलिंग

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

मुंबईच्या विस्तारीत पूर्व उपनगरातील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले.

मुंबईची रेल्वे उपनगरी सेवा म्हणजेच लोकल ही या महानगराची लाइफलाइन आहे. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईची जनवाहिनी आहे. सर्वात स्वस्त आणि सर्वात जलद अशी ही रेल्वे सेवा आहे. म्हणूनच चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसटी)पासून विरार-पालघर-डहाणू, कसारा-कर्जत, पनवेल अशी धावणारी लोकल सेवा ही मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मुंबईकरांच्या सेवेत मेट्रो-मोनो दाखल झाली, हार्बरच्या जोडीला ठाणे-पनवेल ट्रान्स हार्बर आली. नऊ डब्यांचे बारा डबे झाले, आता अनेक गाड्यांना पंधरा डबे आहेत. दर चार ते पाच मिनिटांच्या अंतराने लोकल सेवा आहे. तरीही सर्व देशांतून मुंबईवर लोंढे आदळतच असल्याने वाढती लोकसंख्या व वाढत्या प्रवासी संख्येला उपनगरी रेल्वे सेवा अपुरी पडत आहे.

रोज खचाखच गर्दीतून रेल्वे प्रवास ही मुंबईकरांची मोठी परीक्षा असते. रोज धक्काबुक्कीतून लोकल डब्यात प्रवेश करणे आणि आपल्या स्टेशनवर कसे तरी प्लॅटफॉर्मवर उतरणे यासाठी रोज मुंबईकरांना मोठी कसरत करावी लागते. डब्यात चौथी सीट सोडाच पण नीट उभे राहायला मिळावे म्हणूनही देवाकडे प्रार्थना करावी लागते. रोजचे हाल सांगणार तरी कुणाला?

मध्य, पश्चिम व हार्बर-ट्रान्स आणि हार्बर लोकलमधून रोज पंचाहत्तर लाख मुंबईकर प्रवास करतात. हे कोणी मजा म्हणून लोकलमधून फिरत नाहीत. कोणी हौस म्हणून गर्दीत घुसत नाही. रोजंदारीसाठी, पोटापाण्यासाठी, व्यापार-व्यवसायासाठी, शाळा-कॉलेजसाठी ही गर्दी लोकलमधून जा-ये करीत असते.

त्यात भाजीवाले, मच्छीवाले, फेरीवाले, कामगार-कारकुनांपासून ते टायवाले असतात. याच गर्दीत भजन करणारे नि पोथी वाचणारे असतात आणि मालाची आवक- जावक व शेअर्सचे भाव फोनवर विचारणारे असतात. बहुसंख्य प्रवासी बसायला सीट मिळाली नाही तरी उभे राहूनच मोबाईलवर चॅटिंग करीत असतात. लोकलच्या डब्यात हौशे-गवशे आणि नवशेही भरपूर असतात. त्यात विनातिकीटही बिनधास्त प्रवास करीत असतात.

पाकीटमार आणि मोबाईल चोरांचा वावर असतो. भिकारी, फेरीवाले, नशेडे आणि गर्दुल्लेही याच गर्दीत त्यांच्या धुंदीत असतात. डब्यात शिरायला जागा नाही किंवा येणाऱ्या स्टेशनवर उतरायचे म्हणून लोकलच्या दरवाजात लोक उभे असतात पण त्याचबरोबर काही गणेगंपे आणि रंगेल दरवाजात हातवारे करीत त्यांच्या मस्तीत उभे दिसतात. मुंबईचा लोकल कल्लोळ हा शब्दाने वर्णन करता येणार नाही पण या मुंबईकर प्रवाशांकडे रेल्वे प्रशासनाचे आणि राज्य व केंद्र सरकारने म्हणावे तसे लक्ष नाही...

गर्दी व चेंगराचेंगरीतून लक्षावधी मुंबईकरांचा रोजचा प्रवास रामभरोसे चालू आहे. लोकलच्या अपघातात रोज सात ते आठ माणसे चिरडली जात आहेत किंवा गाडीखाली सापडून मृत्युमुखी पडत आहेत. काहींचे हात-पाय कायमचे निकामी होत आहेत, पण त्याची कधी चर्चाही होत नाही, कारण रोज मरे त्याला कोण रडे... असे मुंबईचे जीवन आहे.

युद्धात किती मृत्युमुखी पडले? प्रयागराजच्या महाकुंभमध्ये किती जणांनी अखेरचा श्वास घेतला? नवी दिल्ली रेल्वे स्टेशनच्या चेंगराचेंगरीत किती जण ठार झाले? बंगळूरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लाखोंच्या अफाट गर्दीत नेमके किती घुसमटून मेले? कोविड काळात मुंबई, महाराष्ट्रात किती जणांचा मृत्यू झाला? अशा प्रश्नांचा भडीमार ऐकायला मिळाला. पण मुंबईच्या लोकल अपघातात रोज आणि दरवर्षी किती मृत्युमुखी पडतात किंवा गेल्या दहा वीस वर्षांत किती मरण पावले असा प्रश्न कोणी जाहीरपणे किंवा संसदेत विचारत नाही.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत लोकल अपघातात ५२ हजार लोकांचा मृत्यू झाला तरीही केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या कोणत्याही सरकारला त्याचे गांभीर्य वाटत नाही का? मुंबईच्या उपनगरी रेल्वे अपघातात आणखी किती बळी जायला हवेत म्हणजे सरकार आणि रेल्वे प्रशासनाला त्याची गंभीर दखल घ्यावीशी वाटेल?

मुंब्रा घटनेनंतर मुंबईतील लोकल अपघाताची रेल्वे मंत्रालयाला सुद्धा दखल घ्यावी लागली. रेल्वे मंत्र्यांनी दिल्लीत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. दरवाजात उभे असलेल्या प्रवाशांचा खाली पडून मृत्यू झाला म्हणून मुंबईतील लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार, अशी घोषणा झाली.

मुंबईत मध्य व पश्चिम रेल्वेच्या उपनगरी मार्गावर एअर कंडिशन्ड लोकल्स धावत आहेत. त्यांना स्वयंचलित दरवाजे आहेत. मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे धावत आहेत त्यांनाही स्वयंचलित दरवाजे आहेत. आता विना वातानुकूलित म्हणजेच साध्या लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार आहेत. पण त्याला आतापासूनच विरोध सुरू झाला आहे. एअर कंडिशन्डचे तिकीट परवडत नाही म्हणून लोकांचा ओढा साध्या लोकलकडे असतो. एसी लोकल्सना मागणी चांगली आहे, त्याही गर्दीने भरलेल्या दिसतात. पण खचाखच गर्दी ही साध्या लोकल्सना असते. स्टेशनवर अवघ्या वीस सेकंद थांबणाऱ्या लोकलमध्ये हजारो लोकांची चढ-उतार शक्य आहे का, हा कळीचा मुद्दा आहे.

लोकल्सला दरवाजे म्हणजे रोगापेक्षा औषध जालीम असे होऊ नये असे प्रवाशांना वाटते. पण लोकलसंबंधी निर्णय घेणारे कधी लोकलमधून प्रवास करीत नसतात, ते त्यांच्या एसी केबिनमधे बसून प्रवाशांची सुरक्षितता ठरवत असतात, त्यामुळे प्रवाशांच्या नेमक्या भावना रेल्वे प्रशासनाला कळत नाहीत. मुंबईत रेल्वे प्रवासी संघटना डझनभर तरी आहेत. त्यांच्याशी रेल्वे प्रशासनाचा संवाद कितपत आहे? प्रवासी संघटना निवेदने देतात पण त्याचे पुढे काय होते? प्रवासी संघटनांशी रेल्वे प्रशासन कितपत संवाद ठेवते?

पत्र देऊन व निवेदने देऊन चर्चेला रेल्वे प्रशासन वेळ देत नाही ही प्रवासी संघटनांची तक्रार असते. सीएसटीहून शेवटची लोकल पूर्वी रात्री १२.४५ वाजता सुटत असे, आता ती १२.१५ वाजता सुटते. यामुळे प्रवाशांची किती गैरसोय होते, याचा प्रशासनाने कधी विचार केलाय का?

एसी लोकल्स वाढवून साध्या लोकल्स रद्द करण्यात येतात तेव्हा प्रवाशांमध्ये असंतोष प्रकट होतो, त्याची दखल प्रशासनाने कधी घेतली आहे का? विशेषतः मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या कधीच वेळेवर धावत नाहीत, रोज त्या उशिरा धावतात व अनेक गाड्या रद्द होतात, हे दुष्टचक्र कधी थांबणार?

मेट्रोच्या गाड्या मिनिटांवर धावतात मग टाइमटेबलनुसार मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या का धावू शकत नाहीत? लांब पल्ल्याच्या गाड्या किंवा मेल-एक्स्प्रेसला प्राधान्य देण्यासाठी लोकल्स रखडवल्या जातात तेव्हा प्रवासी संतप्त होतात. राजधानी, शताब्दी, वंदेभारत, अमृत भारत यांना कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही, पण मुंबईच्या लोकल्स ट्रेनचे वेळापत्रक पाळले गेले पाहिजे हा प्रवाशांचा आग्रह असतो.

लोकलच्या प्रत्येक डब्यात विनातिकीट प्रवासी असतात. प्रथम श्रेणीच्या डब्यातही बिनधास्त परप्रांतीय व त्यांचा परिवार प्रवास करीत असतो. गर्दीच्या वेळी तर प्रत्येक डब्यात दहा-वीस विनातिकीट प्रवासी सीट बळकावून बसलेले असतात. अशा वेळी तिकीट तपासनीस कुठे असतात?

चालत्या गाडीत तिकीट तपासनीसांना तिकिटे वा पास तपासण्याचा रेल्वेने अधिकार दिलेला आहे, असे फलक डब्यात दिसतात, मग टीसी का दिसत नाहीत? रेल्वे स्टेशनवर विनातिकीट प्रवेशच मिळणार नाही अशी यंत्रणा बसवली तर लोकल डब्यातील अनवॉन्टेड गर्दी कमी होऊ शकेल.

मुंबईच्या विस्तारीत उपगरात लोकसंख्या प्रचंड वाढली आहे, दादर, ठाणे, दिवा, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, कुर्ला, अंधेरी, बोरिवली, वसई-विरार, पालघर, नेरूळ, खारघर-पनवेल येथे लोकसंख्येबरोबर प्रवासी संख्या प्रचंड वाढली आहे, हे लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने नियोजन केले पाहिजे. मुंबईत रेल्वे अपघातात चारजण ठार झाले म्हणून रेल्वे मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करणे हास्यापद आहे. सार्वजनिक जीवनात आज कोणी लालबहादूर शास्त्री नाहीत आणि अटलबिहारी वाजपेयीही नाहीत...

■ ■ ■

# शून्यातून शिखरापर्यंत

एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या सुभाष दांडेकर यांनी ज्या प्रकारे कॅम्लिन या भारतीय ब्रँडला घराघरात पोहचवलं, ती कथा आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.




त्यांची वाटचाल शून्यातून शिखरापर्यंतची आहे.

शालेय जीवनात डांडेकर यांना आर्ट आणि सायन्सची विशेष आवड होती. त्यांनी सुरुवातीला रंग बनवण्याचा छोटासा प्रयोग सुरू केला आणि तिथूनच पुढे कॅम्लिनची सुरुवात झाली.

१९३१ साली त्यांनी डोंबिवली येथे एका छोट्याशा गोडाऊनमधून हिंदुस्तान इंक अँड वॉटरप्रूफ वर्क्स सुरू केली. सुरुवातीला फक्त काळा शाई बनवली जात होती, परंतु त्याची गुणवत्ता इतकी उत्कृष्ट होती की ती लवकरच शिक्षक, आर्टिस्ट आणि सरकारी कार्यालयांमध्ये पसंतीस उतरली.

पुढे त्यांनी कॅम्लिन ब्रँड नावाने विविध स्टेशनरी प्रॉडक्ट्स जसे पेन, पेन्सिल, रंग, ब्रश, ग्लू, कंपास बॉक्स इत्यादी बाजारात आणले. त्यांच्या उत्पादनांची खासियत म्हणजे भारतातच निर्मिती, पण आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता.

कॅम्लिनचा वॉटरप्रूफ ब्लॅक इंक तर इतका प्रसिद्ध झाला की भारतातील जवळपास सर्व आर्ट कॉलेजेस आणि आर्किटेक्चर स्टुडंट्स याच शाईचा वापर करू लागले. गुणवत्ता आणि सातत्य यावर त्यांनी कधीही तडजोड केली नाही. त्याचमुळे कॅम्लिनवर लोकांचा विश्वास निर्माण झाला.

२०१२ मध्ये दांडेकर यांनी त्यांच्या मेहनतीने उभ्या केलेल्या कॅम्लिन कंपनीचा काही हिस्सा जपानी कंपनी कोकुयोला विकला. कोकुयोने ५०.७४% हिस्सा घेतला आणि कंपनीचं नाव बदलून कोकुयो कॅम्लिन झालं.

हे टर्निंग पॉइंट असलं तरी दांडेकर यांचा उद्देश स्पष्ट होता, भारतीय स्टेशनरी मार्केटला आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणं.

आजही लाखो लोकांच्या हातात असणाऱ्या कॅम्लिनच्या प्रॉडक्ट्स मागे सुभाष दांडेकर यांची दूरदृष्टी, चिकाटी आणि क्वालिटीवरचा विश्वास आहे. त्यांनी केवळ एक ब्रँड नाही, तर भारतीयांसाठी आठवणींचं एक संचित तयार केलं. प्रत्येक विद्यार्थ्याच्या शालेय बॅगेत कॅम्लिनचं काही ना काही असणं, हीच त्यांच्या यशाची खरी ओळख आहे.

■ ■ ■

## सर्वच लोकल गाड्या वातानुकूलित करण्याची घाई नको!

वाचक लिहितात

मुंब्रा या ठिकाणी झालेल्या अपघाताची दखल घेत राज्य सरकारने भाडेवाढ न करता सर्वच लोकलगाड्या वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली.

याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशीही बोलणे झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई ठाण्यातील रेल्वे मार्गावर सध्या काही प्रमाणात वातानुकूलित लोकल गाड्या धावत आहेत ज्या कधीही त्यांच्या नियोजित वेळेत रेल्वे स्थानकांवर येत नाहीत याचा अनुभव चाकरमानी प्रतिदिन घेत आहेत.

ट्रेनमधील वातानूकुलीन यंत्रांचे दारात गळणारे पाणी, गर्दीच्या वेळेत स्वयंचलित उघड बंद होणाऱ्या दरवाजांना लागणारा अधिकचा कालावधी यामुळे या गाड्यांच्या वेळापत्रकावर प्रतिदिन परिणाम होत असतो ज्यामुळे रोजच काही गाड्या रद्द कराव्या लागतात तर काही वेळा नेहमीच्या धावणाऱ्या लोकल गाड्यांवर त्याचा परिणाम होतो. आजमितीला वातानुकूलित रेल्वेगाड्यांचे तिकीट दर भरमसाठ असल्यामुळे या गाड्यांनी प्रवास करणाऱ्यांची संख्या तुलनेने अल्प असताना इतक्या समस्या येत आहेत तर भविष्यात नेहमीच्या तिकीट दरात सर्वच गाड्या वातानुकूलित केल्या तर लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता केवढी भीषण परिस्थिती उद्भवेल याची कल्पनाही करता येत नाही.

लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे, जे नक्कीच स्वागतार्ह आहे. या आवाहनाला जोपर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही आणि लोकल गाड्यांतील प्रवाशांचा भार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत सर्व गाड्या वातानुकूलित करण्याची घाई करू नये !

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

## वारंवार लघवीला येणं हे कोणत्या आजाराचं लक्षण आहे?




मानवी शरीराला एकदा का व्याधी जडली तर ती सुटणं खूप कठीण होतं. अशा स्थितीत आयुष्यभर त्या व्याधीसह जगावं लागतं. त्यामुळे योग्यवेळीच आजारावर नियंत्रण मिळवणं गरजेचं आहे. शरीरातील काही बदल आपल्याला काही आजारांचे संकेत देत असतात.

वारंवार लघवीला येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तसं असेल तर थायरॉइडचं लक्षण असू शकतं. याबाबत डॉक्टरांचं काय म्हणणं आहे आणि असं का होतं ते समजून घेणं आवश्यक आहे.

मॅक्स हॉस्पिटलचे डॉक्टर रोहित कुमार यांनी सांगितलं की, जर तुम्हाला दिवसभर वारंवार लघवीला येत असेल आणि तितकीच तहानही लागत असेल तर हे मधुमेहाचे संकेत आहे. मधुमेह असल्यास शरीरातील ग्लूकोज व्यवस्थितरित्या प्रोसेस होत नाही. यामुळे किडनी अधिक प्रमाणात मूत्र तयार करते.

**युटीआय :** डॉ. रोहित कुमार यांच्या मते, वारंवार लघवीला येणं हे महिलांमध्ये सामान्य बाब आहे. वारंवार लघवीला येणं आणि मूत्रविसर्जन करताना जळजळ किंवा दुखापत होणं, तसेच लघवीला वास येणे हे युटीआयचे लक्षण असू शकतं. याचा योग्य वेळी उपचार केला नाही किडनीवर परिणाम होऊ शकतो.

**प्रोस्टेस्ट निगडीत समस्या**

प्रोस्टेट ही पुरुषांच्या प्रजनन संस्थेतील एक लहान ग्रंथि आहे. ही ग्रंथी मूत्राशयाच्या खाली आणि मूत्रमार्गाभोवती असते. तिचे मुख्य कार्य म्हणजे वीर्य द्रवात एक विशेष घटक तयार करते. तसेच शुक्राणूंना पोषण देते आणि त्यांची हालचाल सुलभ करतो. पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथी वाढल्याने मूत्रमार्गावर दबाव येतो आणि वारंवार लघवी होते. विशेषतः रात्री लघवीचं प्रमाण अधिक असते.

**ओव्हरएक्टिव्ह ब्लॅडर :** असा स्थितीत वारंवार लघवीला जाण्याची इच्छा होते. थोडं जरी वाटलं तरी तात्काळ टॉयलेटमध्ये जाणं भाग पडतं. लघवी रोखणं कठीण होतं. हे एक न्यूरोलॉजिकल कारणही असू शकतं.

**औषधांची अधिक मात्रा किंवा वारंवार पाणी पिणं**

काही औषधांच्या सेवनामुळे वारंवार लघवीला येऊ शकतं. तसेच उन्हाळ्यात पाणी पिण्याचं प्रमाण वाढतं. यामुळे वारंवार लघवीला होऊ शकतं.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### खरी मैत्री..!

तणाव भय चिंता भौ
व्यक्तिला करते हतबल
जिवाभावाचे मित्र जोडा
सामना करण्याचे मिळे बळ

हिम्मत ज्याची सुटली
त्याचे श्वासही सुटू शकतात
साहसाने करता सामना
चांगले दिवस ही येऊ शकतात

मैत्री असते अंतरीचे नाते
जाणत नाही नाते गोते
संकट समयी धावून येते
प्रामाणिकपणे जपा त्याते..







# पाऊले हळुहळू चाला... मुखाने निवृत्तिनाथ बोला...

## विणेकरी, तुळशीधारी महिलांसह वारकऱ्यांचा सन्मान । वारी मार्गावर मूलभूत सेवा द्यावी । संत निवृत्तीनाथ पालखीचे मनपातर्फे उत्स्फूर्त स्वागत । संस्थानची प्रशासनाकडे मागणी

(दीपक भावसार यांजकडून)



नाशिक । "पायी हळुहळू चाला, मुखाने निवृत्तिनाथ बोला... विठ्ठल बोला... असा जयघोष करीत आषाढी एकादशी पायी वारीसाठी निघालेल्या विश्वगुरू संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखीचे नाशिककरांच्यावतीने महापालिका प्रशासनाने त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील नाशिक पंचायत समितीच्या आवारात प्रचंड जल्लोषात स्वागत केले.

पंचायत समितीत स्वागत समितीच्यावतीने हा कार्यक्रम झाला. यावेळी पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी मूलभूत सेवा सुविधा देण्याबाबत संस्थानकडून प्रशासनकडे मागणी करण्यात आली. यावेळी पालखीतील वीणेकरी व तुळशीधारी महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला. माजी नगरसेवक तानाजी जायभावे यांनी वारकऱ्यांना यावेळी टाळ भेट दिले. "पंढरीची वारी जयाचिये कुळी त्याची पायधुळी लागो मज"... संत नामदेव महाराजांचा अभंगातील या पंक्तीप्रमाणे वारकरी हा वारीचा आत्मा आहे. त्यांचे दर्शन झाले तरी पांडुरंगाचे दर्शन झाले असे विचार नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी मनोगत व्यक्त करताना मांडले. तत्पूर्वी शाल, श्रीफळ, टोपी देऊन वीणेकरी व तुळशीधारी यांचे स्वागत करण्यात आले. अध्यक्षस्थानी स्वागत समितीचे पदाधिकारी माजी आमदार बाळासाहेब सानप होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी जलज शर्मा, कुंभमेळा समितीचे सदस्य भक्तीचरणदास महाराज, पालखीचे मानकरी हभप बाळासाहेब देहूकर, हभप मोहन महाराज बेलापूरकर, हभप जयंत महाराज गोसावी, हभप बाळकृष्ण डावरे यांच्यासह महापालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी असिमा मित्तल, प्रकल्प अधिकारी प्रतिभा संगमनेरे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ, उपमुख्यकार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशीं, संत निवृत्तीनाथ संस्थांनचे अध्यक्ष ॲड सोमनाथ घोटेकर, पालखी सोहोळाप्रमुख नवनाथ गांगुर्डे, सचिव श्रीपाद कुलकर्णी, हभप माधवदास राठी महाराज, स्वागत समितीचे सचिन डोंगरे, पद्माकर पाटील, माजी अध्यक्ष नीलेश गाढवे, हभप कांचन जगताप, गटविकास अधिकारी सोनिया नाकाडे, माजी अध्यक्ष त्र्यंबकराव गायकवाड, जेष्ठ वारकरी पुंडलिकनाना थेटे, रांगोळीकार राजेंद्र जुन्नरकर, रत्नाकर चुंभळे, यासह वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत समयी महंत भक्तीचरण दास महाराज, अध्यक्ष सोमनाथ घोटेकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे नाशिकच्या पंचायत समितीत स्वागत वेळी विणेकरी रांगेत बसले होते. वारीतील चोपदार स्वागत मंडपात अगदीच शिस्तीत उभे होते. एकूणच वारकऱ्यांचा उत्साह आनंद द्विगुणित होता.

### आयुक्तांसह जिल्हाधिकारी टाळ वाजवत वारीत झाले सहभागी

श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखीचे आगमन नाशिक शहरात १२ जून रोजी सकाळी होताच या पालखीचे स्वागत विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, मनपा आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी पालखीचे स्वागत करून भावपूर्ण दर्शन घेतले. रामकृष्ण हरी, जयहरी विठ्ठल माऊलीच्या गजरात जिल्हाधिकारी जलज शर्मा आणि आयुक्त मनिषा खत्री यांनी टाळ वाजवत पंढरपूरला प्रस्थान होणाऱ्या वारीत सहभाग नोंदवला. या वारीत मनपाचे सर्व अधिकारी सहभागी झाले. अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपआयुक्त लक्ष्मीकांत साताळकर, नितीन पवार, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नितीन पाटील, संदेश शिंदें, नितीन राजपूत, गणेश मैद, रवींद्र बागुल, प्रशांत बोरसे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदी अधिकारी सहभागी झाले.

























## महत्त्वाचे

### 'ए एन कराओके क्लब'तर्फे शनिवारी 'अनोखा अंदाज' मैफल

**नाशिक** । येथील ए एन कराओके क्लबतर्फे शनिवारी (दि. १४) अनोखा अंदाज या हिंदी चित्रपट गीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी लता, आशा यांनी गायलेली लोकप्रिय गाणी पुरुष गायक सादर करणार आहेत तर पुरुष गायकांच्या आवाजातील गाणी महिला कलाकार सादर करतील. अशी माहिती संयोजक नितीनकुमार चव्हाण यांनी दिली. कुसुमाग्रज स्मारकातील विशाखा सभागृहात सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या विनामूल्य कार्यक्रमात श्रीकांत जोशी, अविनाश येवलेकर, मुकेश पंडित, डी. डी. मोरे, सुरेश पुजारी, सागर उगले,अरुण आव्हाड, चंद्रशेखर कोटकर, जगन्नाथ पाटील, गणेश शेजवलकर, जयेश वाघ, विजय पोळ, उदय महाजन, दिलीप चोपडे, सी. देशपांडे, के. सुरेश,कैलास वर्पे, श्रेणिक जैन, मेधा सोनवणे, अनिता खर्डे, उमा अग्रवाल, विजया जाधव, संध्या चोपडे हे कलाकार गाणी सादर करतील. अंजली नितीनकुमार या सूत्रसंचालन करतील तर ध्वनी व प्रकाश व्यवस्था सचिन तिडके सांभाळणार आहेत. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## नाईक संस्था आय.टी.आय.मध्ये शिवराज्यभिषेक दिनानिमित्त कार्यक्रम

**नाशिक** । येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्थेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.

या निमित्ताने कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे आय.टी.आय मधील मोटर मेकॅनिक व्हेईकल ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेले इलेक्ट्रिक जॅक,इलेक्ट्रिशियन ट्रेड च्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेले फॉल्ट डिटेक्शन इन ट्रान्समिशन लाईन इ. प्रकल्प तंत्र प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षण व नागरिक कर्तव्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.शरद काकड व प्रमुख व्याख्याते डॉ.बाळासाहेब चकोर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नितीन काळे होते.वयाप्रसंगी मंचावर माणिक काकड आदी उपस्थित होते.



कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची ऑनलाईन उद्घाटनपर भाषण प्रसारित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून झाली. प्रमुख व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करताना "पर्यावरण संरक्षण व नागरिकत्व" या विषयाच्या अनुषंगाने जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे, मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ.बाळासाहेब चकोर यांनी केले. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी तुमची-आमची सर्वांची आहे,आई आणि मुलांचं नातं हे जगातील सर्वात मौल्यावान नाते आहे. आपण आपल्या आईसाठी फारसे काही देऊ शकत नाही; पण आपण आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे असं आवाहन प्रा.डॉ. बाळासाहेब चकोर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. डॉ.शरद काकड म्हणाले की, मानवाने विकासाच्या नावाखाली निसर्गाच्या पर्यावरणाचा फार मोठ्या प्रमाणात ऱ्हास केला. त्याचाच दुष्परिणाम म्हणून मानवी जीवन धोक्यात आले आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढाकार घ्यावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माणिक काकड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय निदेशक आनंद जाधव यांनी करून दिला.

## मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियानात देवळ्याची शिवाजी मराठा इंग्लिश स्कूल शाळेची जिल्हास्तरावर निवड

**देवळा** । महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात देवळा येथील श्री शिवाजी मराठा इंग्लिश स्कूलने उल्लेखनीय कामगिरी करत तालुकास्तरावरील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. या यशाबद्दल शाळेला रोख रु. 3,00,000/- चे पारितोषिक मिळाले .

या उपक्रमात शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकांनी एकत्रितपणे मेहनत घेतली, स्वच्छता, शाळेचे सौंदर्यीकरण, भिंतींची रंगसजावट, शैक्षणिक गुणवत्ता , इ. बाबींमध्ये शाळेने उत्कृष्ट कामगिरी बजावली. या यशामध्ये गटशिक्षणाधिकारी सतिश बच्छाव, शिक्षण विस्तार अधिकारी किरण विसावे , केंद्रप्रमुख आहेर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून या उपक्रमाला दिशा दिली. शाळेच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन प्राचार्य डॉ हितेंद्र आहेर, उपाध्यक्षा सुशीलाताई आहेर, सचिव प्रो.डॉ.सौ. मालती आहेर, प्रशासक बी. के. रौंदळ, स्कूल कमिटी सदस्य तथा पालक संघ यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले. राज्य शासनाने "मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियान" राबविले .या अभियानात ग्रामीण भागातील शाळांनी सहभाग घेतला.



देवळा येथील श्री शिवाजी मराठा स्कुलमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छता व सौंदर्यीकरण, शिस्त आदी बाबींमुळे पालकांचे लक्ष वेधून आहे.

यामुळे ग्रामीण भागातील शाळा देखील या माध्यमातून उच्च पातळीवर पोहोचू शकतात, हे आमच्या स्कुलला तालुकास्तरावर मिळालेल्या प्रथम पारितोषिकावरून सिद्ध झाले आहे.



# नियोजन चोख ठेवा

**भटकंती**

वर्षाविहाराचा आनंद काही वेगळाच असतो. तुम्हीही मित्रमैत्रिणी वा कुटुंबासह पावसाळ्यात भटकंती करण्याचा बेत आखत असाल. मात्र हे मजेदार पण तितकेच आव्हानात्मक काम आहे. म्हणूनच पूर्वनियोजनाकडे जातीने लक्ष द्या. गट सहलींमध्ये बजेट आणि योजना समन्वयाची समस्या असते. ती दूर करण्यासाठी खालील ट्रॅव्हलिंग टिप्स नक्की फॉलो करा.

✲ ग्रुप ट्रिपमधील सर्वात मोठे आव्हान प्रत्येकाच्या आवडी-निवडींचा समतोल साधणे हे असते. काही लोकांना साहस आवडते, त्यांना नवीन पदार्थ चाखायचे असतात तर काहींचा एक्सप्लोर करण्यापेक्षा आराम करण्यावर भर असतो. म्हणूनच स्थळ, उपक्रम आणि बजेट ठरवताना यावर सर्वांचे मत घेणे महत्त्वाचे आहे. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यानुसार एक लवचिक योजना आखा. असे केल्यास शेवटच्या क्षणी एखादी नवीन गोष्ट जोडायची झाली तरी कोणालाही अडचण येणार नाही.

✲ बरेच लोक एकत्र असतात तेव्हा पैशांबाबत गोंधळ होणे सामान्य आहे. काही लोकांना जास्त पैसे खर्च करायचे असतात तर काहींना कमी बजेटमध्ये मॅनेज करायचे असते. हा असमोल लक्षात घेऊन आधी सर्वांना विचारा आणि नंतरच हॉटेल, वाहतूक, जेवण आणि उपक्रमांसाठी अंदाजे बजेट सेट करा. सहलीत मजा करा पण नेहमी बजेट लक्षात ठेवा, जेणेकरून नंतर कोणत्याही गोष्टीवरून मतभेद होणार नाहीत.

✲ ग्रुप ट्रिप असताना शेवटच्या क्षणी बुकिंगवर अवलंबून राहू नका. बऱ्याचदा शेवटच्या क्षणी मोठ्या ग्रुपसाठी हॉटेलच्या खोल्या बुक करता येत नाहीत. म्हणून हॉटेल्स आणि वाहतूक व्यवस्था इत्यादी आगाऊ बुक करण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला नंतर काळजी करावी लागणार नाही.

✲ ग्रुप ट्रिपमध्ये एका व्यक्तीला सर्वकाही व्यवस्थापित करणे कठीण होऊ शकते. म्हणून काम वाटून घ्या. उदाहरणार्थ, एखादीचे काम हॉटेल बुक करणे असेल, एखादीने ट्रेनची तिकिटे किंवा कार बुक करण्याकडे लक्ष द्यावे तर एखादीने दररोजचा मेन्यू ठरवावा. यामुळे तुमच्यात समन्वय राहील आणि प्रवासात आराम करू शकाल.

✲ ग्रुप ट्रिपमध्ये सुरक्षितता आणि संवादाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत एकमेकांशी बोलणे, संपर्क साधणे सोपे होईल याची खात्री करा. प्रत्येकाने एकमेकांचे फोन नंबर आणि हॉटेलचा पत्ता सेव्ह केलेला असावा. याशिवाय कुठेही बाहेर जाल तेव्हा सर्वजण एकत्र येतील अशी बैठकीची जागा निश्चित करा. महत्त्वाचे म्हणजे काही आपत्कालीन रोख रक्कम बरोबर ठेवा. गरज पडली तर त्याची मोठी मदत होऊ शकते.

# अस्मिता

भारतीय वंशाच्या प्रसिद्ध बायोटेक्नॉलॉजिस्ट आणि शास्त्रज्ञ डॉ. परविंदर कौर यांनी इतिहास रचला असून ऑस्ट्रेलियन संसदेत निवडून येणाऱ्या त्या पहिल्या शीख महिला ठरल्या आहेत. पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या विधान परिषदेचे (एमएलसी) सदस्य म्हणून अलिकडेच त्या निवडून आल्या आहेत. ही केवळ वैयक्तिक कामगिरी नाही तर नेतृत्व, समानता आणि समावेशनाच्या दिशेने केलेली मोठी प्रगती मानली जात आहे.



## ठसा उमटवणारी कामगिरी

**मानिनी**

डॉ. कौर यांनीही सोशल मीडियावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, हा फक्त माझा विजय नाही तर हे प्रतिनिधित्व आणि समावेशाच्या दिशेने टाकलेले एक सामूहिक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

डॉ. परविंदर कौर यांचा जन्म आणि शिक्षण भारतात झाले. पुढे पीएचडी स्कॉलर म्हणून त्या ऑस्ट्रेलियात गेल्या. तेथे त्यांनी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात मोठा ठसा उमटवला. त्यांनी १५ वर्षांहून अधिक काळ जीनोमिक्स (डीएनए आधारित संशोधन) मध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः लुप्तप्राय प्रजातींच्या संवर्धनातील त्यांचे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. डॉ. कौर यांनी एका नाविन्यपूर्ण डीएनए लॅबचे नेतृत्व केले आहे. हा प्रकल्प विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जैवविविधता संवर्धनाला चालना देण्यासाठी काम करतो. विज्ञान समाजाच्या सेवेत आणणे हे सर्वात महत्त्वाचे काम असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

डॉ. कौर यांनी आपल्या राजकारणातील प्रवेशाचे वर्णन 'नवीन करिअर' म्हणून केले नाही, तर ते एक 'कॉलिंग' म्हणून केले आहे. म्हणजेच हा करिअर बदल नाही तर या सुंदर देशाची सेवा करण्याची संधी आहे, असे त्यांचे मत आहे. यारुपाने आपण विज्ञान, समुदाय आणि अनुभवाची शक्ती संसदेत आणत आहोत, असे मत त्या व्यक्त करतात.

लेबर सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात डॉ. कौर संसदेत आल्या. लेबर पार्टीच्या तिकिटावर त्यांना १३ वे स्थान मिळाले. त्यांचा प्रवास संपूर्ण राज्याला फायदा देणाऱ्या आणि कायमचा वारसा निर्माण करणाऱ्या कामापर्यंत सुरूच राहील. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये महात्मा गांधींचे नावही उद्धृत केले. स्वतःला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वतः हरवून जाणे असा आहे, असे त्या म्हणतात.

डॉ. कौर यांचे योगदान केवळ संशोधन प्रयोगशाळांपुरते मर्यादित नाही. त्या विज्ञान संवाद समर्थक आणि लिंग समानता सल्लागारही म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी 'एक्स प्लांटा प्रायव्हेट लिमिटेड' नामक एका बायोटेक स्टार्टअपची स्थापना केली आहे. ही संस्था नैसर्गिक आरोग्य उपाय विकसित करते. त्यांच्या कामगिरीमध्ये ऑस्ट्रेलियन अकादमी ऑफ सायन्सेसने दखल घेतली असून 'सायन्स अँड इनोव्हेशन अवॉर्ड' (२०१३), मायक्रोसॉफ्टचा 'एआय फॉर अर्थ अवॉर्ड' (२०१९-२०), 'वेस्टर्न ऑस्ट्रेलिया महिला हॉल ऑफ फेम' (२०२३) आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. कौर यांची प्रेरणादायी कहाणी भारतीय समुदायाच्या हृदयाला स्पर्श करणारी आहे.

## वारंवार चहाची तल्लफ येते?

**आहारशास्त्र**

वेळेच्या आधी आणि अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात अगदी धूमधडाक्यात आगमन करुन यंदा पावसाने दमदार हजेरी लावली आणि सगळ्यांचीच भंबेरी उडवून दिली. आता पुढचे चार महिने पावसात चिंब होण्याचे आहेत. तेव्हा या वातावरणात तजेला, स्फुर्ती देणारा चहा तर हवाच. पावसाळ्यात चहाची वारंवार तल्लफ येते. मात्र जास्त चहा पिणे आरोग्यास हानी पोहोचवू शकते हे आधीच लक्षात घ्या. चहा पिल्याने मूड ताजा होत असला आणि त्याचे तात्पुरते काही फायदे असले तरी तोटेदेखील बरेच आहेत. विशेषतः तुम्ही चुकीच्या वेळी चहा प्यायला तर ते निश्चितच धोकादायक ठरु शकते. म्हणूनच चहा पिण्याची योग्य आणि चुकीची वेळ लक्षात घ्यायला हवी. आज याविषयी जाणून घेऊ या.

✲ चहा कधीही रिकाम्या पोटी पिऊ नये, कारण यामुळे कॉर्टिसॉल असते. रिकाम्या पोटी चहा घेतल्यास छातीत जळजळ वाढते आणि कालांतराने अल्सरदेखील होऊ शकतो.



✲ रात्री झोपण्यापूर्वी तीन ते चार आधी चहा अजिबात पिऊ नये. यामुळे तुमची झोप बिघडू शकते आणि चिंता तसेच निद्रानाशाच्या समस्या वाढू शकतात.

✲ तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असेल तर जास्त चहा पिणे अत्यंत हानिकारक ठरू शकते. चहाचे स्वरूप आम्लयुक्त असल्यामुळे छातीत जळजळ वाढते.

✲ जेवणापूर्वी किंवा नंतर चहा पिणे टाळावे कारण चहामुळे पचनसंस्थेची पोषक तत्वे शोषण्याची क्षमता कमी होऊ शकते.

आता तुम्ही विचार करत असाल की, चहा पिण्याच्या सर्व वेळा चुकीच्या असतील तर योग्य वेळ कोणती? मैत्रिणींनो, तुम्ही उठल्यानंतर एक-दोन तासांनी चहा पिऊ शकता. शक्यतो दुपारी १२ वाजण्यापूर्वी चहा घ्या. विशेष म्हणजे नाश्त्यात काजू आणि पौष्टिक बिया खाल्ल्यानंतरच चहा प्या. कधीकधी रात्री तुम्ही चहा पिऊ शकता. तथापि, हे फक्त रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्यांसाठी सूचवले जाते. अन्यथा कोणताही आहारतज्ज्ञ रात्री चहा पिण्याचा सल्ला देत नाही.



## व्यवसाय करा, यशस्वी व्हा

**स्कील डेव्हलपमेंट**

अनेकींना नोकरीच्या चक्रात अडकायचं नसतं. कौटुंबिक जबाबदारी किंवा इतर काही कारणांमुळे त्यांना नोकरीच्या वेळा सांभाळता येत नाहीत. अशा वेळी घरीच एखादा व्यवसाय करण्याचा विचार केला जातो. तुम्ही गुणवत्तेच्या बळावर पुढे जाऊ शकता. एखाद्या कौशल्याच्या आधारे चांगलं उत्पन्न मिळवू शकता. नवी कौशल्यं आत्मसात करू शकता.

✲ नृत्य कौशल्य असणाऱ्या महिला घरात नृत्याचे वर्ग सुरू करू शकतात. सध्या शास्त्रीयच नाही तर वेस्टर्न डान्सलाही प्रचंड मागणी आहे. तुम्ही उत्तम नृत्यांगना असाल तर डान्स क्लास सुरू करू शकता. सध्या झुंबा डान्सचीही क्रेझ आहे. हा नृत्यप्रकार शिकून तुम्ही झुंबा डान्स क्लास सुरू करू शकता.

✲ तुमच्या हाताला चांगली चव असेल तर केटरिंगचा व्यवसाय सुरु करता येईल. टिफिन सेंटरचा पर्यायही तुमच्याकडे आहे. विविध खाद्यपदार्थ बनवून त्यांची विक्री करता येईल.


✲ सध्या फिटनेसबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. योगा, मेडिटेशन करण्याकडे लोकांचा कल आहे. योगाचं प्रशिक्षण घेऊन तुम्ही योग क्लास सुरू करा. मेडिटेशनची तंत्रही शिकवता येतील.

✲ घरच्या घरी शिकवणी वर्ग घेता येतील. अगदी पहिलीपासून दहावी, बारावीच्या मुलांचे शिकवणी वर्ग तुम्ही घेऊ शकता.

## वापरावे कोणते सनस्क्रीन?

**स्कीन केअर**

सध्या बाजारात अनेक प्रकारचे सनस्क्रीन विकले जात आहेत. अशा परिस्थितीत कोणते सनस्क्रीन चांगले हे ठरवणे आणि खरेदी करणे कठीण ठरते. सनस्क्रीन स्टिक, सनस्क्रीन स्प्रे आणि सनस्क्रीन जेल यामधून कशाची निवड करावी हे समजत नाही. म्हणूनच आज याविषयी सविस्तर जाणून घेऊ या.



✲ **सनस्क्रीन स्टिक-** हे सनक्रीन कडक स्वरूपात येते आणि ते थेट त्वचेवर लावले जाते. ते लिप बाम किंवा डिओडोरंट स्टिकसारखे दिसते. फायद्यांबद्दल बोलायचे झाले तर ते लावणे खूप सोपे आहे. विशेषतः डोळे, नाक किंवा कानाखाली ते सहज लावता येते. मुख्य म्हणजे लावल्यानंतर ते पसरत नाही आणि चिकटही वाटत नाही. ते सहजपणे बॅगेत ठेवता येते आणि प्रवास करताना पुन्हा-पुन्हा लावणे देखील सोपे आहे. तसेच त्वचा संवेदनशील असेल किंवा तुम्हाला क्रीम किंवा लोशनचा त्रास होत असेल तर सनस्क्रीन स्टिकहा एक चांगला पर्याय असू शकतो.

✲ **सनस्क्रीन स्प्रे-** हे एका एरोसोल कॅनमध्ये येते आणि त्वचेवर फवारले जाते. हा सनस्क्रीन वापरण्याचा सर्वात सोपा आणि जलद पर्याय आहे. खास वैशिष्ट्य म्हणजे ते मागच्या किंवा पायांसारख्या कठीण भागांवर देखील सहजपणे लावता येते. यातही चिकटपणाची समस्या नसते.

✲ **सनस्क्रीन जेल-** हे हलक्या, जलाधारित फॉर्म्युलामध्ये येत असल्यामुळे त्वचेवर सहज पसरते तसेच लवकर शोषले जाते. याशिवाय ते हलके असते. चिकट नसल्यामुळे चेहरा तेलकट होत नाही. तसेच याच्या वापराने चेहऱ्यावर मुरुम किंवा ॲलर्जीचा त्रासही जाणवत नाही. हे सनस्क्रीन त्वचेवरील छिद्रे बंद करत नाही. सनस्क्रीन जेल शरीराच्या केसाळ भागांवर सहज लावता येते.

कोणताही सनस्क्रीन निवडताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते नियमितपणे आणि योग्य प्रमाणात लावणे. कमीत कमी एसपीएफ ३० आणि ब्रॉड-स्पेक्ट्रम असणारे (यूव्ही आणि यूव्हीबी या दोन्हीपासून संरक्षण करणारे) सनस्क्रीन निवडावे. ते दर दोन-तीन तासांनी लावायला विसरू नये.

## खजुराची चविष्ट बर्फी

**रसगंधा**



मिठाई खायची असल्यास दुकानात जाण्याची गरज नाही. घरीच तुम्ही छान छान पदार्थ करु शकता. चला तर, आज आक्रोड-खजुराची चविष्ट बर्फी बनवून बघा.

**साहित्य :** अर्धा कप आक्रोड, एक कप खजूर, चमचाभर तूप इत्यादी.

**कृती :** प्रथम खजुरातल्या बिया काढून छोटे तुकडे करा. आक्रोडाचेही छोटे तुकडे करून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात तूप घाला. तूप वितळल्यावर त्यात आक्रोडचे तुकडे परतून घ्या. आता परतलेले तुकडे बाजूला ठेवा. याच कढईत खजुराचे तुकडे घालून परता. दोन ते तीन मिनिटात खजूर वितळू लागेल. खजूर वितळायला सुरूवात झाली की त्यात आक्रोडाचे तुकडे घाला. हे मिश्रण सतत हलवत रहा. साधारण पाच मिनिटांनी खजूर आणि आक्रोड एकजीव होतील. त्यानंतर गॅस बंद करा. एका ताटाला थोडं तूप लावून त्यात आक्रोड खजुराचं मिश्रण घाला. हे मिश्रण थंड झाल्यावर चौकोनी किंवा आयताकृती वड्या कापून घ्या. चविष्ट मिठाईचा आस्वाद घ्या.

## आधी शिक्षणाकडे लक्ष दे

**काय करू?**

१८ वर्षांची तरुणी असून सध्या बारावीत शिकते आहे. मी अभ्यासात हुशार आहे. प्रशासकीय अधिकारी बनावं, अशी माझ्या पालकांची इच्छा आहे. मलाही उत्तम करिअर घडवायचं आहे. भविष्यात पालकांना माझं लग्न आयएएस अधिकाऱ्याशी लावून द्यायचं आहे. त्यांनी अनेकदा याचं सुतोवाच केलं आहे. याच कारणामुळे पालक मला इतर मुलांशी बोलू देत नाहीत. ते माझ्या करिअरकडे खूप गांभीर्याने बघतात. मात्र गेल्या तीन वर्षांपासून मी एका मुलाच्या प्रेमात पडले आहे. तो इंजिनिअर असून लवकरच उत्तम पगाराची नोकरी मिळेल याबाबत मला अजिबात शंका नाही. पण माझ्या पालकांना श्रीमंत नाही तर प्रतिष्ठित जावई हवा आहे. त्यामुळे ते आमच्या लग्नाला परवानगी देणार नाहीत, असं मला वाटतं. पालकांची बाजूही योग्य आहे. अशा परिस्थितीत मी काय करू?

– मैत्रिणी, तू अजून लहान आहेस. सद्य परिस्थितीत तू करिअरकडे लक्ष देणं गरजेचं आहे. एवढ्या लहान वयात भविष्याचा निर्णय घेणं खरं तर योग्य नाही. तू बारावीत आहेस. त्यामुळे तू अभ्यासालाच प्राधान्य द्यायला हवं. दुसरीकडे तुझ्या प्रियकरानेही नुकतीच इंजिनिअरींगची पदवी मिळवली आहे. त्यामुळे त्यानेही पुढच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करायला हवं. आयुष्यात बस्तान बसवण्याचे हे दिवस आहेत. तुला आयएएस अधिकारी बनवण्याचं पालकांचं स्वप्न आहे. त्यामुळे आत्ता त्यांच्यापुढे तुमच्या लग्नाचा किंवा नात्याचा विषय काढणं योग्य ठरणार नाही. तुम्हा दोघांनी करिअरवर लक्ष केंद्रित करावं हेच त्यांचंही मत असेल. त्यामुळे थोडा धीर धर. अभ्यासावर लक्ष केंद्रित कर. मधल्या काळात प्रियकराच्या संपर्कात रहा. त्याला परिस्थितीची कल्पना दे. आयुष्यातली ध्येय साध्य करा. मगच लग्नाचा विषय काढा.



**हेअर केअर**

### केस वाढतील पटकन



काळेभोर, लांब केस खूप छान दिसतात. लग्न किंवा दुसऱ्या एखाद्या समारंभासाठी केस वाढवावेसे वाटतात. पण बराच वेळ लागतो. मात्र केस लवकर वाढण्यासाठी काही उपाय करता येतील. केस वेळोवेळी ट्रिम करून घ्या. केस ट्रिम केल्याने फाटे फुटलेल्या केसांचं प्रमाण कमी होतं आणि केस वाढायला मदत होते. केसांना प्रथिनांची गरज असते. यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करा. केसांवर विविध उत्पादनांचा मारा करू नका. नैसर्गिक पद्धतीने केस वाढू द्या.

**स्मार्ट टिप्स**

### गॅसची बचत करा




स्वयंपाकाचा गॅस लवकर संपत असेल किंवा त्याचा वापर अधिक प्रमाणात होत असेल तर या टिप्स फॉलो करा. यामुळे गॅस फार वाया जाणार नाही. कोणताही पदार्थ बनवण्याआधी सगळी तयारी करून ठेवा. भाज्या, भात कूकरमध्ये शिजवा. भांड्यावर झाकण ठेवल्याने अन्न लवकर शिजतं आणि गॅसही कमी वापरला जातो. त्यामुळे अन्नपदार्थ शिजवताना भांडं झाकून ठेवा. फार मोठ्या भांड्यांचा किंवा कढईचा वापर करू नका. पदार्थाच्या प्रमाणानुसार भांड्यांचा वापर करा. थंड पदार्थ गरम व्हायला वेळ लागत असल्याने फ्रीजमधल्या भाज्या, दूध साधारण तासभर आधी बाहेर काढून ठेवा. अशा प्रकारे तुमचा गॅसची बचत होईल.

**स्मार्ट टिप्स**

### असा टिकवा परफ्युमचा सुगंध



परफ्युमचा सुगंध सगळीकडे दरवळायला हवा. मात्र परफ्युम स्प्रे करताना होणाऱ्या चुकांमुळे हा सुगंध फार वेळ टिकत नाही. म्हणूनच परफ्युम कधीही चोळून लावू नये. ते फवारा. त्यातही परफ्युम अंगावर फवारणं गरजेचं आहे. कपड्यांवरचं परफ्युम फार काळ टिकून रहात नाही. कोरड्या त्वचेवर परफ्युम फार काळ टिकत नाही. त्यामुळे त्वचेवर ऑईल फ्री मॉईश्चरायझर लावून मगच परफ्युम स्प्रे करा.



# पश्चिम आशियातील तणावामुळे सेन्सेक्स 823 अंकांनी घसरला

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारात गुरुवार १२ जून रोजी मोठी घसरण झाली. सेन्सेक्स जवळपास ८२३ अंकांनी घसरला. तर निफ्टी २४,९०० च्या खाली आला. कमकुवत जागतिक संकेत आणि इस्रायल-इराणमधील तणाव वाढण्याची ताजी भीती यामुळे गुंतवणूकदारांची भावना कमकुवत झाली. सकाळच्या व्यवहारात सेन्सेक्सने १४५.९ अंकांची वाढ नोंदवत ८२,६६१.०४ चा उच्चांक गाठला. त्याच वेळी निफ्टी ५४.८ अंकांच्या वाढीसह २५,१९६.२० च्या पातळीवर पोहोचला. मात्र, थोड्याच वेळात दोन्ही निर्देशांक घसरले.

व्यवहार बंद होताना सेन्सेक्स ८२३.१६ अंकांनी घसरून ८१,६९१.९८ वर बंद झाला. एनएसई निफ्टी २५३.२० अंकांनी घसरून २४,८८८.२० वर बंद झाला. निफ्टीमध्ये इन्फोसिस, इटरनल, टेक महिंद्रा आणि टाटा मोटर्स हे सर्वात जास्त घसरले.

**अमेरिकेकडून पुन्हा एकदा टॅरिफचा धोका**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी असे संकेत दिले आहेत की ते अमेरिकेशी व्यापारी संबंध असलेल्या देशांना पुढील १-२ आठवड्यात एकतर्फी शुल्क दरांबद्दल माहिती देणारे पत्र पाठवणार आहेत. ९ जुलैपासून उच्च दर पुन्हा लागू करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी हे पत्र पाठवले जात आहे. ते म्हणाले, काही काळानंतर, आम्ही आता थेट पत्र पाठवणार आहोत की हा एक करार आहे, तुम्ही तो स्वीकारू शकता किंवा नाही. सध्या अमेरिकेने फक्त ब्रिटनसोबतच टॅरिफ फ्रेमवर्कवर पोहोचले आहे. याशिवाय, चीनसोबत तात्पुरते टॅरिफ युद्धबंदी जाहीर करण्यात आली आहे.

**पश्चिम आशियातील तणाव**

इराणवर इस्रायलच्या हल्ल्याच्या शक्यतेमुळे अमेरिका हाय अलर्टवर आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने इराकमधील बगदाद येथील दूतावासातून काही कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना बाहेर काढण्यास मान्यता दिली आहे. याशिवाय अमेरिकेने कुवेत आणि

**सेन्सेक्स 81,691**

**निफ्टी 24,888**

बहरीनच्या दूतावासांनाही अनावश्यक कर्मचारी काढून टाकण्यास सांगितले आहे. इस्रायल लवकरच इराणवर हल्ला करण्याची तयारी करत असल्याच्या बातम्या येत आहेत आणि ही बातमी गुंतवणूकदारांना चिंतेत टाकणारी आहे.

बुधवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (FIIs) भारतीय शेअर बाजारातून ४४६.३१ कोटी रुपये किमतीचे शेअर्स विकले. यामुळे बाजारावरील नकारात्मक दबाव वाढला.

आज बहुतेक आशियाई बाजारपेठांमध्ये विक्रीचे वातावरण आहे. शांघायचा एसएसई कंपोझिट, जपानचा निक्केई २२५ आणि हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक सुमारे १% कमी व्यवहार करत होते. याशिवाय, काल अमेरिकन शेअर बाजारही घसरणीसह बंद झाले आणि गुरुवारी सकाळी वॉल स्ट्रीट फ्युचर्स देखील घसरले होते. यामुळे आज शेअर बाजारातील भावना कमकुवत राहिली.

# राज ठाकरे आणि मुख्यमंत्री यांच्यात हॉटेल ताज लँडस एन्डमध्ये एक तास चर्चा

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची युती होणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. महापालिका निवडणुकीसाठी हे दोन्ही नेते एकत्र येणार असल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे मनसे आणि उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांकडून दोन्ही नेत्यांचे फोटो असलेले बॅनरही लावले जात आहेत. दोन्ही नेत्यांची युती झाल्यातच जमा असल्याचं चित्र रंगवलं जात असतानाच या सर्व गोष्टींना राज ठाकरे यांनी धक्का दिला आहे. राज यांनी आज थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. विशेष म्हणजे ही भेट मंत्रालय किंवा वर्षा बंगल्यावर झाली नाही. तर मुंबईतील एका बड्या हॉटेलात ही भेट झाली आहे. त्यामुळे मनसे महायुतीत येण्याच्या किंवा मनसे



महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. या भेटीतून पाच महत्त्वाच्या गोष्टी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात हॉटेल ताज लँडस एन्डमध्ये भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये तासभर चर्चा झाली. त्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. एक म्हणजे ही बैठक मंत्रालयात न होता एका हॉटेलात झाल्याने उलटसुलट चर्चांना अधिकच बळ मिळालं आहे. या भेटीवेळी फडणवीस आणि राज ठाकरे यांच्याशिवाय तिसरी व्यक्ती उपस्थित नव्हती. त्यामुळेही राजकीय चर्चांनी जोर धरला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे याच हॉटेलात राज आणि फडणवीस यांची लोकसभा निवडणुकीवेळी भेट झाली होती. योगायोग म्हणजे लोकसभा निवडणुकीवेळी राज आणि फडणवीस ताज लँडस एन्डमधील रुम नंबर 2101 या रुममध्येच भेटले होते. या रुममध्ये झालेल्या बैठकीनंतर राज ठाकरे महायुतीत आले होते. त्यांनी महायुतीचा प्रचारही केला होता. आजही या दोन्ही नेत्यांची याच हॉटेलातील रुम नंबर 2101 रुममध्ये भेट झालीय. त्यामुळे राज पुन्हा महायुतीत येऊन महापालिका निवडणूक लढणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होत्या. खासदार संजय राऊत तर रोज यावर भाष्य करून युतीची वातावरण निर्मिती करत होते. त्यामुळे ही युती होणार असल्याची चर्चा होती. आदित्य ठाकरे यांचा 13 जून रोजी वाढदिवस आहे. आणि राज ठाकरे यांचा 14 जून रोजी वाढदिवस आहे. त्यामुळे ठाकरे गटाकडून राज्यात जोरदार बॅनरबाजी करण्यात आली आहे. आदित्य ठाकरे यांना शुभेच्छा देणाऱ्या बॅनरवर राज ठाकरे यांचाही फोटो लावला आहे. त्यामुळे युती होणारच अशी चर्चा सुरू असताना फडणवीस यांनी राज यांची भेट घेऊन या चर्चांना ब्रेक दिला आहे. फडणवीस यांचा हा ऐनवेळचा मास्टर स्ट्रोक असल्याचं सांगितलं जात आहे.

लोकसभा निवडणुकीवेळी राज ठाकरे महायुतीत आले होते. पण विधानसभेला राज ठाकरे हे स्वबळावर लढले होते. त्यानंतर पुन्हा एकदा राज यांना सोबत घेण्याचे महायुतीचे प्रयत्न आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची युती होण्याची शक्यता बळावली आहे. ही युती रोखण्यासाठीच राज यांना महायुतीत घेण्याचा प्रयत्न फडणवीस करत असल्याचं सांगितलं जातंय. त्यासाठीही ही भेट अत्यंत महत्त्वाची असल्याचं मानलं जातंय.

राज ठाकरे महायुतीत येऊन महापालिका निवडणूक लढण्याची शक्यता आहे. तसं झाल्यास राज्यातील सत्तेत राज ठाकरे वाटा मागण्याची शक्यता आहे. मनसेला सत्तेत मंत्रीपद आणि आमदारकी देण्यावरही महायुतीत चर्चा होऊ शकते. याशिवाय मुंबई, ठाणे, नाशिक आणि पुणे या चार महत्त्वाच्या महापालिकेतील सत्तेचं सूत्रही ठरल्यावरच राज ठाकरे महायुतीत येऊ शकतात असं सांगितलं जातं.

महापालिका निवडणुकीसाठी फडणवीस आणि राज यांची आज झालेली चर्चा महत्त्वाची असल्याचं सांगितलं जात आहे. विधानसभा निवडणुकीत मनसे आणि महायुतीत मतभेद झाले होते. त्यामुळे राज ठाकरे स्वबळावर लढले होते. माहीममध्ये राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे उभे होते. पण या ठिकाणी महायुतीने उमेदवार दिला होता. त्यामुळे राज आणि महायुतीत दुरावा निर्माण झाला होता. हा दुरावा दूर करण्याचाही आजच्या बैठकीतून प्रयत्न झाल्याचं सांगितलं जातंय.

# मुलुंड क्षेपणभूमीवरील कचऱ्यावर विहित वेळेत प्रक्रिया करून त्याची तत्काळ विल्हेवाट लावावी - पालिका आयुक्तांचे निर्देश



**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

मुंबईतील विविध भागांतून मुलुंड क्षेपणभूमी येथे आणल्या जाणाऱ्या कचऱ्यावर विहित वेळेत योग्य ती प्रक्रिया करुन त्याची तत्काळ विल्हेवाट लावावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिले आहेत. मुलुंड क्षेपणभूमी येथील बायो-मायनिंग प्रकल्पास श्री. गगराणी यांनी आज गुरूवारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

मुलुंड क्षेपणभूमीवरील कचरा निष्कासित करुन मूळ जागा पुनर्प्राप्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने प्रयत्न सुरू आहेत. याच अनुषंगाने, महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने मुलुंड येथील क्षेपणभूमीवरील सुमारे ७ दशलक्ष मेट्रिक टन कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करुन त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी बायो-मायनिंग प्रकल्प राबविला जात आहे. कचऱ्यातील माती, ज्वलनशील पदार्थ तसेच राडारोडा किंवा दगडासारख्या घटकांचे वर्गीकरण करुन त्यावर याठिकाणी प्रक्रिया केली जाते. ऑक्टोबर २०१९ पासून हे प्रकल्प कार्यरत असून याठिकाणी आतापर्यंत ४.८१ दशलक्ष मेट्रिक टन म्हणजे ६८.७७ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली आहे.

गगराणी यांनी भेटीदरम्यान मुलुंड क्षेपणभूमीवर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या यंत्रसामग्रीची पाहणी केली. तसेच, कचऱ्यावरील प्रक्रियेबाबतही त्यांनी माहिती जाणून घेतली.

# विमान अपघात : मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात महाराष्ट्र सहभागी – अजित पवार

**अकोला, दि. १२ प्रतिनिधी**

गुजरातच्या अहमदाबाद विमानतळावरून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या अपघातात मृत्यूमुखी पडलेले प्रवासी आणि स्थानिक नागरिक यांच्याविषयी तीव्र शोकभावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

अहमदाबाद शहरातील इमारतींवर कोसळलेल्या या विमान दुर्घटनेबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना पवार म्हणाले, "ही घटना संपूर्ण देशाला हादरवून सोडणारी असून मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात प्रत्येक महाराष्ट्रवासी सहभागी आहे."


या दुर्घटनेनंतर विमानसेवा कंपन्यांनी सुरक्षेच्या निकषांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट इशारा दिला. "विमान कंपन्यांनी त्यांच्या सेवांचा सुरक्षा फेरआढावा घ्यावा आणि भविष्यात अशी दुर्घटना होणार नाही यासाठी सर्व उपाय योजनांची अंमलबजावणी करावी," असे ते म्हणाले. पवार पुढे म्हणाले की, "अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान उड्डाणानंतर थोड्याच वेळात इमारतींवर कोसळले. या दुर्घटनेत अनेक निष्पाप जीव गमावले गेले. जीवितहानी मोठी असून ती भरून न निघणारी आहे. अपघाताचे कारण स्पष्ट होणे बाकी असले तरी अशा घटना टाळण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे."

**अमेरिका-इराण वाढत्या तणावादरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा निर्णय!**

# मध्य पूर्वेतून कर्मचाऱ्यांना बाहेर पडण्याच्या सूचना

**वॉशिंग्टन, दि. १२ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्य पूर्वेबाबत बुधवारी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी हे धोकादायक ठिकाण असल्याचे सांगत येथून काही अमेरिकन सैन्य बाहेर काढले जात असल्याचे म्हटले आहे. याबरोबरच ट्रम्प यांनी अमेरिका इराणला अण्वस्त्र मिळवू देणार नाही असेही स्पष्ट केले आहे.



अमेरिकेकडून इराणची राजधानी बगदाद येथे असलेला त्यांचा दुतावास देखील काही प्रमाणात रिकामा केला जात आहे. अमेरिकन दूतावासातील सर्व अनावश्यक कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना मध्यपूर्वेतील त्यांचे ठिकाण सोडण्यास सांगण्यात आले आहे. स्थानिक सुरक्षेला वाढता धोका पाहता या सूचना देण्यात आल्या आहेत, अमेरिकन आणि इराकी सूत्रांनी या घडामोडींबद्दल बुधवारी रॉयटर्स या वृत्तसंस्थेला माहिती दिली आहे.

एकीकडे कर्मचाऱ्यांना देश सोडण्यास सांगितले जात असताना, दुसरीकडे या रिपोर्ट्समध्ये नेमका कोणत्या प्रकराचा धोका आहे याबद्दल मात्र स्पष्टता देण्यात आली नाही. मात्र याचा परिणाम बाजारावर झाल्याचे पाहायला मिळाले. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमती या ४ टक्क्यांपेक्षा जास्तीने वाढल्या.

बगदाद येथील दुतावासातील काही कर्मचाऱ्यांना देशातून बाहेर पडण्यात सांगण्यात आल्याबद्दल विचारले असता, व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या ॲना केली म्हणाल्या , "स्टेट डिपार्टमेंटकडून परदेशात असलेल्या कर्मचाऱ्यांचा सातत्याने आढावा घेतला जातो आणि नुकतेच घेतलेल्या आढाव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे," रॉयटर्सने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

"ते धोकाधायक ठिकाण ठरू शकते म्हणून त्यांना बाहेर काढले जात आहे कारण, आणि आपण काय होतं ते पाहूयात, आम्ही बाहेर पडण्यासाठी सूचना दिल्या आहेत," असे डोनाल्ड ट्रम्प यांनी माध्यमांना सांगितले. मध्यपूर्वेतील सुरक्षेला असलेला धोका कमी करण्यासाठी काही करता येईल का याबद्दल विचारले असता ट्रम्प इराणचा संदर्भ देत म्हणाले की, "त्यांच्याकडे अण्वस्त्र असू शकत नाही. हे अगदी सोपं आहे, त्यांच्याकडे अण्वस्त्र असू शकत नाहीत." अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटने बुधवारी प्रवासासंबंधीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील बदल केला आहे.

अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटने बुधवारी या मार्गदर्शक सूचनांमध्ये केलेल्या बदलांची माहिती देताना सांगितले की, "११ जून रोजी, भागात वाढलेल्या तणावामुळे स्टेट डिपार्टमेंटने नॉन-एमर्जन्सी अमेरिकन सरकारी कर्मचाऱ्यांना बाहेर पडण्याच्या सूचना दिल्या आहेत."

# पुस्तकवेडा

एखाद्या व्यक्तीला बरेचदा आपण 'पुस्तकवेडा' अशी उपाधी देऊन मोकळे होतो. खरंतर 'पुस्तकवेडा' म्हटल्यावर त्याचं कौतुक वाटायला हवं. पण, या कौतुकाच्या ऐवजी उपहास वाट्याला येतो. अनेकांना ते फारसे आवडत नाही.पुस्तकाचा शोधलेला आधार एकटेपणा घालविण्यासाठी उपयुक्त ठरतो. तसेच त्यामुळे ज्ञानदेखील मिळते. वाचनाचं वेड, सवय, लागण्याचं कारण काही का असेना, पण वाचनक्रिया व यातून मिळणारा आनंद वेगळाच असतो. अशीच एका वाचनप्रेमीची कहाणी अन्य व्यक्तींनादेखील प्रेरणादायी ठरणारी आहे.



कोल्हापूर, डोंबिवली आणि नाशिक कार्यक्षेत्र असलेले मोहन विनायक पागे यांना असाच पुस्तकांचा लळा... ते मूळचे कोल्हापूरचे. पण, नोकरीनिमित्त ते डोंबिवलीत दाखल झाले. त्या पूर्वीपासून शालेय वयापासून त्यांना वाचन आणि पुस्तकांचा छंद जडला. शिक्षण झाल्यावर त्यांनी टेलिफोन खात्यात अभियंता म्हणून नोकरीस सुरुवात केली. सुमारे पाच वर्षांपूर्वी विभागीय अभियंता म्हणून ते नोकरीतून निवृत्त झाले. त्यांच्या नोकरीच्या काळात हा छंद चांगलाच विकसित झाला. आपल्या छंदासाठी त्यांनी जुन्या बाजारातून किंवा अगदी रद्दीच्या दुकानातून स्वस्त दारात दुर्मीळ पुस्तके आणण्याचा सपाटा सुरू केला. एकेकाळी त्याच्या सदनिकेत सर्वत्र पुस्तकेच पुस्तके दिसत असत. हजारो पुस्तके एका व्यक्तींनी केवळ आवड म्हणून विकत आणण्याचा हा अनोखा प्रयत्न होता. इतकी पुस्तके घरात होती की, पलंगाखाली आणि स्वच्छतागृहाच्या वरील जागेतदेखील पुस्तके ठेवावी लागत होती.

**लोकमानस**

वाचन म्हणजे जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा महत्त्वाचा वाटा असतो. यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करा. त्याचप्रमाणे जगण्याच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे. ज्ञानात सतत वाढ करण्यासाठी वाचन हा एकमेव मार्ग आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत पुस्तके हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय.

आवडलेले पुस्तक आणायचे आणि सवड मिळेल तसे वाचायचे, असा मोहन पागे यांचा छंद.

**मुलखावेगळी माणसं**

यातून त्यांनी विविध अभ्यासक्रम घेतलेल्या विद्यार्थी आणि नात्यातील मंडळींना त्या त्या विषयाची पुस्तके विनामूल्य देण्याचा प्रघात सुरू केला. इंजिनिअरिंग, सायन्स, साहित्य, विविध भाषा अशी विविधता त्यात असल्याने अनेकांना ती पुस्तके उपयुक्त ठरली. अनेकदा त्याच्यावर टीकादेखील झाली. मात्र, त्यांनी आपली आवड जोपासलीच. नाशिकमधील अनेक नातेवाईकांना, त्यांच्या मुलांना त्यांनी पुस्तके भेट दिलेली आहेत.

२३ एप्रिल रोजी 'जागतिक ग्रंथ दिन' साजरा झाला. त्यावेळी मोहन पागे हे नाशिकमध्येच होते. त्यांनी मोठ्या कष्टाने अनेक पिशव्यांतून पुस्तके भरून आणली होती. स्वतः आणून ती त्यांनी इच्छुकांना भेट दिली. त्यांचे वाचनदेखील जबरदस्त असून त्यासाठी मराठी, इंग्रजी असे भाषेचे बंधन नाही. विषयदेखील कोणताही चालतो. कोणत्याही विषयावर पुस्तकाबद्दल बोलले की, त्याच्याकडून खूप माहिती मिळते. बाकी जीवनात इतरांसारखे असलेले मोहन विनायक पागे हे पुस्तकांबाबत मात्र हळवे आहेत. कधीही भेटले की, त्यांना पुस्तकांचा विषय काढल्याशिवाय चैन पडत नाही. पुस्तक देवघेव योजनेतदेखील त्यांनी अनेक उत्तम पुस्तके मिळविली आहेत. आताशा मात्र त्यांनी पुस्तकांची संख्या कमी केली आहे. अनेक पुस्तके गरजूंना, काही वाचनालयांना देऊन जागा मोकळी केली आहे. मात्र, त्यांची आवड कायम असून नव्या-जुन्या पुस्तकांची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

# मुंबादेवी येथील रोबोटिक पार्किंग प्रकल्प बंद करण्याचा पालिकेचा विचार

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेने चार ठिकाणी बहुस्तरीय रोबोटिक पार्किंग उभारण्याचा निर्णय घेतला. मात्र स्थानिकांच्या विरोधामुळे माटुंगा रेल्वे स्थानकाबाहेरील रोबोटिक पार्किंग प्रकल्प गुंडाळावा लागला. यापाठोपाठ मुंबादेवी येथील प्रकल्पही बंद करण्याचा महापालिकेचा विचार आहे. यावर लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेची मुंबईतील रस्त्यांवरील पार्किंगची जागा मेट्रो, विविध विकासकामे आदी कारणांमुळे कमी होत आहे. त्यामुळे महापालिकेनेही बहुस्तरीय रोबोटिक पार्किंगबरोबरच रस्त्यांवरील पार्किंग सुविधेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेने वरळी इंजिनीअरिंग हब, मुंबादेवी, हुतात्मा चौक, अप्सरा पेन शॉपजवळ आणि माटुंगा पूर्वेला रेल्वे स्थानकाबाहेर बहुस्तरीय रोबोटिक पार्किंग उभारण्याचा निर्णय घेत कामालाही सुरुवात केली. मात्र स्थानिकांच्या विरोधामुळे माटुंगा आणि मुंबादेवी येथील कामे रखडली.

माटुंग्यातील वाहनतळ प्रकल्प बंद करण्याचा निर्णय महापालिकेने नुकताच घेतला. त्यापाठोपाठ मुंबादेवी प्रकल्पही गुंडाळण्याच्या तयारीत महापालिका आहे.

# विमान दुर्घटनेनंतर काँग्रेसचा मशाल मोर्चा स्थगित; तीन दिवस दुखवटा जाहीर

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

अहमदाबाद आणि मुंबई विमान दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने आपला राज्यव्यापी मशाल मोर्चा आंदोलन तातडीने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करत काँग्रेसने पुढील तीन दिवस दुखवटा पाळण्याचे जाहीर केले आहे. मशाल मोर्चा आंदोलन हे विधानसभेतील कथित मतचोरीच्या विरोधात काँग्रेसतर्फे नियोजित करण्यात आले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील निवडणुकीत मतचोरी झाल्याचा गंभीर आरोप केला होता. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ गडचिरोली येथे मोर्चामध्ये सहभागी होणार होते. मात्र, दुर्दैवी दुर्घटनेमुळे काँग्रेसने आंदोलन स्थगित करत संवेदनशीलता दाखवली आहे. काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी सर्व जिल्हा काँग्रेस समित्यांना निर्देश दिले आहेत की, दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्तींना आदरांजली वाहण्यात यावी. १५ जूननंतर मशाल मोर्चांची नवीन तारीख निश्चित करून ती प्रदेश काँग्रेसला कळवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसने घेतलेल्या या निर्णयामुळे, पक्षाने सार्वजनिक भावना लक्षात घेतल्याचे चित्र स्पष्ट झाले असून पुढील मोर्चा अधिक ठोस तयारीनिशी पार पडेल, असा विश्वास काँग्रेस नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

# रेनलिक्सचे जगातील पहिले स्वदेशी एआय स्मार्ट हेमोडायलिसिस मशीन

मूत्रपिंडासंबंधी आजारांच्या (रीनल केअर) क्षेत्रातील तंत्रज्ञान नवोन्मेषाने समर्थ अग्रेसर कंपनी, रेनलिक्स हेल्थ सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेडने रिमोट मॉनिटरिंग आणि क्लिनिकल कनेक्टिव्हिटी सुविधेसह भारतातील पहिले पूर्णपणे स्वदेशी, कृत्रिम प्रज्ञा (एआय) आणि क्लाउड-सक्षम स्मार्ट हेमोडायलिसिस मशीन रेनलिक्स आरएक्सटी २१ प्रस्तुत केले आहे. या यंत्राची किंमत ६.७० लाख रुपयांपासून सुरू होते, अर्थात आयात केलेल्या मशीनपेक्षा ती लक्षणीयरीत्या कमी आहे. रेनलिक्स आरएक्सटी २१ मुळे डायलिसिस परवडणारे आणि मोठ्या लोकसंख्येसाठी उपलब्ध करून दिले जाईल आणि निमशहरी आणि ग्रामीण भागात मूत्रपिंड विकाराच्या उपचारातील मागणी-पुरवठ्यातील दरी भरून काढली जाणे अपेक्षित आहे.



भारतात पूर्णपणे विकसित आणि उत्पादित, रेनलिक्स - आरएक्सटी २१ यंत्र हे क्लाउड-आधारित टेलिनेफ्रॉलॉजी प्लॅटफॉर्मसह नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करते जेणेकरून मूत्रपिंड रुग्ण, एंड-स्टेज रीनल डिसीज (ईएसआरडी) रुग्णांना, विशेषतः हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी, फुफ्फुसीय आणि तीव्र मूत्रपिंड दुखापतीशी संबंधित समस्या असलेल्या रुग्णांना सुरक्षितता आणि दर्जेदार निगेचा लाभ मिळू शकेल.

**दखल**

रेनलिक्स आरएक्सटी २१ मुळे रेनलिक्स ही युरोपीय महासंघ ईयू सीई (EU CE) प्रमाणपत्रासह प्रगत डायलिसिस यंत्र तयार करणारी जागतिक स्तरावरील सहावी आणि भारतातील पहिली कंपनी बनली आहे.रेनलिक्स पुढील चार वर्षांत, म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेरपर्यंत ५,००० मशीनची उत्पादन क्षमता निर्माण करण्यासाठी ८०० कोटी रुपये गुंतवण्याची योजना रेनलिक्सने आखली आहे आणि आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत १,५०० मशीनची अतिरिक्त क्षमता कंपनी विकसित करेल. कंपनीची स्वदेशी वापराच्या वस्तूंचे उत्पादन करण्याची योजना देखील आहे.

# वाढत्या गर्दीवर नियंत्रणासाठी सर्व एसी लोकल पर्याय योग्य आहे का?

**वाद संवाद**

**१] अमेय गोगटे [पत्रकार ]**

अलीकडेच मुंबईमध्ये खचाखच भरलेल्या रेल्वेच्या डब्यातून प्रवाशांचे हात सटकल्याने मुंब्रा स्थानकादरम्यान मोठी दुर्घटना घडली आणि त्यात १० प्रवाशांचा मृत्यू झाला. हे टाळण्यासाठी राज्य सरकारने सर्व लोकल एसी चा जो निर्णय घेतला आहे तो योग्य वाटतो. कारण त्यामुळे डब्यामधील प्रवाशांच्या क्षमतेनंतर लोक बाहेर लटकून प्रवास करणार नाहीत आणि अशा दुर्घटना देखील होणार नाहीत.

**२] मोहन जोग [पोलीस अधिकारी ]**

प्रवाशांच्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी सर्व लोकल एसी हा पर्याय योग्य वाटत असला तरी मेट्रो आणि लोकल मध्ये खूप फरक आहे. कारण गाडीच्या डब्यामध्ये खचाखच प्रवाशांची गर्दी झाली तर प्रवासी आतमध्ये गुदमरतील आणि पोलिसांना देखील या गर्दीवर नियंत्रण करताना प्रचंड ताण येईल. त्यापेक्षा सर्व लोकल १५ डब्यांच्या करणे रास्त वाटते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# आरसीबीचा सत्कार सोहळा सरकारने आयोजित केला नव्हता कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण

**बंगळुरू, दि. १२ वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) या संघाने आयपीएल २०२५ ही स्पर्धा जिंकल्यानंतर बंगळुरुतील विधानसभा ते चिन्नास्वामी स्टेडियम अशी विजययात्रा (व्हिक्टरी परेड) काढली होती, तसेच चिन्नास्वामी स्टेडियमवर विजयोत्सव साजरा केला. मात्र हा कार्यक्रम पाहण्यासाठी, आरसीबीच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी प्रचंड मोठी गर्दी जमली होती. या कार्यक्रमाच्या नियोजनात पोलिसांच्या ढिसाळ कारभारामुळे, बेजबाबदार नियोजनामुळे चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा बळी गेला. तसेच ४० हून अधिक लोक जखमी झाले.



या घटनेवरून विरोधी पक्ष कर्नाटक सरकारवर टीका करत आहेत. दरम्यान, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विरोधकांच्या टीकेला उत्तर दिलं आहे. सिद्धरामय्या म्हणाले, "४ जून रोजी विधानसभेसमोर आरसीबीच्या संघाचा जो कौतुक सोहळा पार पडला त्याचं आयोजन सरकारने केलं नव्हतं. सरकारने केवळ राज्यपाल थावरचंद गहलोत यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचं निमंत्रण दिलं होतं".

कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणाले, "कर्नाटक राज्य क्रिकेट संघ (केएससीए) व आरसीबीने मिळून विधान सौदा येथील कार्यक्रम आयोजित केला होता. मला कार्यक्रमाच्या दिवशीच ११.२९ वाजता निमंत्रण मिळालं होतं जे मी स्वीकारलं. राज्याच्या मुख्य सचिवांनी देखील माझ्याशी बातचीत केली होती, त्यावर मी त्यांना पुढे जाण्यास सुचवलं. राज्यपाल देखील त्या कार्यक्रमाला आले होते. काही प्रसारमाध्यमांनी दावा केला आहे की राज्यपालांना त्या कार्यक्रमाचं निमंत्रण नव्हतं तरी देखील ते तिथे आले होते. मात्र, हे वृत्त चुकीचं आहे".

सिद्धरामय्या म्हणाले, "मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव के. गोविंदराज (ज्यांना आता या पदावरून हटवलं आहे) यांनी राजभवनात फोन केला होता. तो फोन त्यांनी माझ्याकडे दिला. त्यांनी मला सांगितलं राज्यपाल देखील येत आहेत. त्यानुसार मी राज्यपालांशी बातचीत केली आणि त्यांना सांगितलं की मी देखील त्या कार्यक्रमाला जातोय, तुम्ही देखील या. मी त्यांना बोलावलं होतं. त्यामुळे राज्यपाल देखील त्या कार्यक्रमात सहभागी झाले. मात्र, पावसामुळे हा कार्यक्रम केवळ २० मिनिटे चालला. त्यामुळे आम्ही दोघे लगेच तिथून निघून गेलो. मात्र, काही वर्तमानपत्रे व वृत्तवाहिन्या दावा करत आहेत की राज्यपालांना त्या कार्यक्रमासाठी कोणी बोलावलं नव्हतं. त्यामुळे मी हे स्पष्टीकरण देतोय.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**